नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

सौ. तारा शास्त्री
सुरेश डोळके
वसंत वऱ्हाडपांडे
म. ना. सरपटवार
ना. मा. सरपटवार
प्र. रा. देशपांडे
गुणाकर देशपांडे
निशिकान्त करकरे
उ. रा. गिरी
वसंत माधव
पु. गो. मुंघाटे
द. चिं. सोमण
श्री. नानासाहेब बापट
या शिवाय
ग्रंथसमालोचन, संघवार्ता
इत्यादि

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

सप्टेंबर १९५३

किंमत आठ आ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] सप्टेंबर १९५३ [अंक ९ वा

अनुक्रमणिका

	लेख		पृष्ठ
१	संपादकीय राजभाषा अधिनियम लोकमान्यांचा मंडाले येथील निवास मन:पूर्वक अभिनंदन		१
२	सोवती (लघुकथा)	--सौ. तारा शास्त्री	४
३	पाखरूं (गद्यकाव्य)	--श्री. सुरेश डोळके	७
४	कांही कविता	...	८
	पहाट	--श्री. वसंत वऱ्हाडपांडे	
	तुझ्या माझ्यांतलें प्रेम	--श्री. म. ना. सरपटवार	
	स्मृतीचें तर्पण	--श्री. ना. मा. सरपटवार	
	संपलें ग रामायण	--श्री. प्र. रा. देशपांडे	
	वंदिस्त	--श्री. गुणाकर देशपांडे	
	तुझ्याकडे	--श्री. निशिकांत करकरे	
	आली पहाट लाजत	--श्री. उ. रा. गिरी	
	वध ना अता अंत	--श्री. वसंत माधव	
५	बौद्ध पूर्वकालीन वैदिक वाङ्मय व बुद्धाची शिकवण	--श्री. पुं. गो. मुंघाटे	१२
६	बर्फाचा तुकडा (लघुकथा)	अनुवादक--श्री. द. चिं. सोमक	१९
७	दोन पत्रें	--श्री. नानासाहेब वाघट, --एक धुळेकर	२४
८	ग्रंथसमालोचन	--वसंत वऱ्हाडपांडे	२७
९	संघवार्ता		३०

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

वर्ष ८ वें सप्टेंबर १९५३ अंक ६ वा

सं पा द की य

राजभाषा अधिनियम

राजभाषा अधिनियमासंबंधीचा मध्यप्रदेश सरकारचा निर्णय ता. १४ ऑगस्ट १९५३ रोजीं रात्रीं खास गॅझेट काढून प्रसिद्ध करण्यांत आला. व त्यावरोवरच मुख्यमंत्री, पं. रविशंकर शुक्ल, यांचा हा सरकारी निर्णय निष्ठेने अमलांत आणण्यासंबंधी हिंदीभाषी आणि मराठीभाषी जनतेला आवाहन करणारा संदेशहि ता. १५ ऑगस्ट रोजीं प्रसिद्ध झाला. या निर्णयानुसार ता. १ सप्टेंबर १९५३ पासून राजभाषा अधिनियम या राज्यांत सर्वत्र अमलांत येऊन हिंदी आणि मराठी या राजभाषा म्हणून सर्वत्र सारख्याच दर्जाने नांदूं लागणार, हें उघड आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी सरकारने काढलेलें नोटीफिकेशन जरी दिसावयाला निरपवाद दिसलें, तरी विदर्भ साहित्य संघाने अधिनियमांत ज्या दुरुस्त्या करण्याची मागणी केलेली होती आणि जी मागणी सहानुभूतिपूर्वक विचारांत घेण्याचें आश्वासन मुख्य मंत्र्यांनी पुन:पुन: दिलेलें होतें, त्या मागणीच्या दृष्टीने विचार केल्यास, हें नोटिफिकेशन असमाधानकारक आहे, असेंच म्हणावें लागतें.

अर्थात् विदर्भ साहित्य संघाच्या दृष्टीने, राजभाषा अधिनियमाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही; व त्यांत दुरुस्ती करून घेण्यासंबंधीचे प्रयत्न 'राजभाषा अधिनियम उपसमिती' कडून चिकाटीने पुढे चालूं ठेवण्यांत येतील, हें निश्चित. मुख्य मंत्र्यांच्या सूचनेनुसार श्री. पु. य. देशपांडे, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. बाळासाहेब ढवळे आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी ता. ५ ऑगस्ट १९५३ रोजीं सायंकाळीं ७॥ वाजतां मुख्य मंत्र्यांची भेट त्यांचे निवासस्थानीं घेतली. त्यावेळीं जें बोलणें झालें त्यांत मुख्य मंत्र्यांनी कांही व्यावहारिक अडचणी त्यांना सांगितल्या. व त्या दूर करण्याच्या कामीं सहविचार आणि सहकार्य व्हावें, अशी अपेक्षा व्यक्त केली. या भेटीनंतर, ता. ८ ऑगस्ट रोजीं, उपसमितीची सभा होऊन, या अडचणींचा विचार करण्यांत आला; व ता. १० ऑगस्ट रोजीं मुख्य मंत्र्यांना पत्र पाठवून असें कळविण्यांत आलें की, "दक्षिण आफ्रिका आणि स्वित्झर्लंड या दोन राष्ट्रांत अनेक राजभाषा अस्तित्वांत आहेत. तेथे राज्यकारभारांत आणि विधानसभेंत ज्या पद्धतीने त्यांचा उपयोग करण्यांत येतो, त्या पद्धतीने मध्यप्रदेशांतहि हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांचा उपयोग करण्यांत यावा. व तशा प्रकारची सुधारणा 'राजभाषा अधिनियमांत' करण्यांत यावी."

या प्रश्नासंबंधी अधिनियम उपसमितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी भारतांतील स्वित्झर्लंडच्या वकिलाशीं पत्रव्यवहार करून, त्यांच्याकडून स्वित्झर्लंडमध्ये ज्या तीन राजभाषा कायद्याने अस्तित्वांत आहेत, त्यांची अंमलबजावणी आणि उपयोग हीं कशा रीतीने केलीं जातात, यासंबंधी अधिकृत माहिती मागविली होती. त्यांच्या ता. १० ऑगस्टच्या पत्राला नव्या दिल्लीहून ता. १८ ऑगस्ट रोजीं जें उत्तर स्वित्झर्लंडच्या वकिलांनी पाठविलें, त्यावरोबरच स्वित्झर्लंडांतील राज्यशास्त्रज्ञ प्रोफेसर जॉर्ज थूरेर यांचा या प्रश्नासंबंधीचा अधिकृत लेख पाठविला होता; व आपल्या उत्तरांत त्या लेखाचा निर्देश करून स्वित्झर्लंडच्या वकिलांनी असें म्हटलें होतें की,—

As you will learn from this treatise, four different languages are spoken in my country, but only three of them are considered official languages. All official bills and

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

notices are introduced in the Federal Assembly in the three official languages and all Government publications are published in these three idioms. From time to time the Federal Government publishes the translations of some important codes and laws in Romansch, which is spoken by one per cent of the population. German, French and Italian are equally used for all official purposes so that for instance, speeches in the Federal Assembly are held in one of these languages. Every citizen is entitled to use his own language when approaching the Government or summoned to court. Swiss unity has never been endangered by difference of languages. There has never been in any part of the people a conscious sentiment of ethnological or lingual majority, or a secessionist tendency particularly because linguistic frontiers do not coincide with political or religious borders.

या अधिकृत माहितीवरून स्वित्झर्लंडमध्ये ज्या तीन राजभाषा प्रचलित आहेत, त्यांचा दर्जा आणि अंमलबजावणीची पद्धति यांची यथार्थ कल्पना लोकांना येईल. श्री. माडखोलकर यांनी स्वित्झर्लंडच्या वकिलांचें हें पत्र आणि प्रो. जॉर्ज थुरेर यांचा लेख हीं दोन्ही मुख्य मंत्र्यांकडे अवलोकनार्थ पाठविलीं आहेत. 'विदर्भ साहित्य संघा'च्या आजीव सदस्य असलेल्या भारतीय संसदेच्या सौ. अनसूयाबाई काळे या देखील स्वित्झर्लंडच्या वकिलांना भेटल्या व या प्रश्नासंबंधी सर्व प्रकारची अधिकृत माहिती 'विदर्भ साहित्य संघाला' पुरविण्यासंबंधी त्यांनी वकील साहेबांना विनंती केली, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें आवश्यक आहे.

*

लोकमान्यांचा मंडाले येथील निवास

लोकमान्य टिळकांच्या जीवनांत आणि आधुनिक भारताच्या इतिहासांत, लोकमान्यांच्या मंडाले येथील वास्तव्याला फार मोठें महत्व आहे. लोकमान्यांची संपूर्ण हयात राजकारणाने व्यापलेली. इतर कारणांकडे त्यांनी लक्ष देतों म्हटलें, तरी तें अशक्यच. यामुळें इंग्रजी सरकारने कांही काळपावेतों त्यांना मंडाले येथें ठेवून त्यांच्यावर आणि भारतेतिहासावर उपकारच केले असें म्हणायला हरकत नाही. मंडाले येथील तुरुंगांत राहावें लागल्यामुळे त्यांचा राजकारणाशीं तात्पुरता संबंध तुटला. मिळालेल्या निवांत काळांत त्यांना आपल्या मनाचें कार्य हातीं घेतां आलें. गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र हा ग्रंथ लिहून हातावेगळा करतां आला. वैदिक पंचांगावर त्यांनी लेखन केलें. या विषयांच्या अभ्यासाकरिता त्यांनी खूप वाचलें, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषा हस्तगत केल्या. निरनिराळ्या विषयांचा अभ्यास केला. वाचलेल्या भागांतील अवतरणें उतरून घेतलीं. पद्धतशीरपणें ज्ञानसंग्रह व अभ्यास केला. हें सगळें ते करूं शकले याला कारण त्यांचें मंडाले येथील वास्तव्य. जर मंडाले येथें त्यांची रवानगी झाली नसती तर कर्मयोगशास्त्र लिहून काढायला टिळकांना कधीच अवसर मिळाला नसता.

मंडाले येथील तुरुंगांतील लोकमान्यांचें जीवन, त्यांचा अभ्यास आणि त्यांचें ग्रंथलेखन याविषयींची संपूर्ण अस्सल माहिती सुरक्षित आहे. आजवर या साहित्याचा उपयोग करून कुणी लेखन केलें नव्हतें. केवळ तात्यासाहेब केळकरांनी या साहित्याचा उपयोग लोकमान्यांचें चरित्र तयार करतांना केला होता. या साहित्याचा उपयोग करून, केसरीच्या दोन ऑगस्टच्या अंकांत श्री. चिं. ग. काशीकर यांनी 'टिळकांनी मंडाले येथे लिहिलेल्या वह्या' हा लेख प्रसिद्ध केला. वह्या किती, त्यांचे अनुक्रम, प्रत्येक वहीमधील मजकूर याविषयीं तर त्यांनी माहिती दिली आहेच. परंतु दोन पानें अक्षर–मुद्रितांचीं दिलीं आहेत.

श्री. काशीकरांचा हा प्रयत्न दृष्टीला पडल्यावर, मनांत विचार आला, लोकमान्यांच्या मंडाले येथील वास्तव्यावर एक संपूर्ण, स्वतंत्र ग्रंथ कां निर्माण होऊं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नये? साहित्य तर सगळें अस्तित्वांत आहेच. या ग्रंथांतून तुरुंगांतील लोकमान्यांचें दैनंदिन जीवन, त्यांचा अभ्यास, वाचन, कर्मयोगशास्त्राचें लेखन या सगळ्या-विषयीं माहिती त्यांच्याच वह्यांमधील साहित्याचा उपयोग करून आणि त्यांच्या वह्यांमधील कांहीं भागाचीं अक्षर–मुद्रितें तयार करून ग्रंथांत समाविष्ट करावीं. १९५६ मध्ये लोकमान्यांचा १०० वा जन्म-दिन साजरा करण्याचा सोहळा अखिल भारतांत होईल. त्या प्रसंगीं लोकमान्यांची स्मृति अशा ग्रंथानें जागवली तर तें खास उचित होईल.

*

मनःपूर्वक अभिनंदन

कै. वामन मल्हार जोशी यांचा स्मृतिदिन, ‘मुंबई मराठी साहित्य संघ’ या संस्थेकडून, दरवर्षी एका विशेष उचित रीतीने साजरा करण्यांत येत असतो. वामनरावांच्या ज्या वाङ्मयीन निर्मितीमुळे व ज्या गुणांमुळे त्यांना वाङ्मयक्षेत्रांत महत्वाचें स्थान प्राप्त झालें, त्या गुणांची व कार्याची परंपरा पुढे चालू ठेवण्याचा अंतःकरणपूर्वक प्रयत्न करणें म्हणजेच त्यांचें खरें स्मारक होय. या दृष्टीने, तत्वज्ञान, उच्च वाङ्मय-समीक्षण, काव्यशास्त्रविनोद, सत्यान्वेषण इत्यादि वामनरावांना प्रिय असलेल्या विषयांपैकी एखाद्या विषयावर, कोणातरी अधिकारी, अभ्यासू व सुविद्य वक्त्याची व्याख्यानमाला, स्मृतिदिनाच्या सुमारास घडवून आणणें व यथाकालीं ग्रंथरूपाने तीं व्याख्यानें प्रसिद्ध करून, त्यांचा यथावकाश आस्वाद घेण्याची सोय वाचकांसाठी करणें, असें महत्वाचें कार्य इ. स. १९४४ पासून ‘साहित्यसंघ’ करीत आहे व त्यासाठी तो प्रशंसेस खचित पात्र आहे.

या व्याख्यानमालेंत अनेक प्रसिद्ध वक्त्यांचीं व्याख्यानें झालीं व तीं ग्रंथरूपाने प्रकाशितहि झालीं. इ. स. १९४४ सालीं ही व्याख्यानमाला गुंफण्याचा मान, नागपूर महाविद्यालयांतील सुप्रसिद्ध प्राध्यापिका व विदर्भ साहित्य संघाच्या पूर्वाध्यक्ष आणि जबलपूर येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष **सौ. कुसुमावतीबाई देशपांडे** यांना मिळाला. त्यांच्या व्याख्यानांचा विषय म्हणजे ‘मराठी कादंबरीचें पहिलें शतक’ (इ.स. १८५० ते १९५०) असा होता. हीं व्याख्यानें प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयकीर्तीला साजेशीं झालीं. त्या व्याख्यानांचा पूर्वभाग नुकताच ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाला आहे. या वाङ्मयगौरवाबद्दल आम्ही प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांचें हार्दिक अभिनंदन करतों.

यंदा ही माला गुंफण्यासाठी, अमरावतीच्या ‘शिवाजी महाविद्यालया’चे सुप्रसिद्ध प्राध्यापक **गणेश त्र्यंबक ऊर्फ नानासाहेब देशपांडे**, यांना निमंत्रण देण्यांत आलें होतें. प्रा. नानासाहेब देशपांडे, ‘युगवाणी’-च्या वाचकांना माहीत आहेतच. त्यांचा ‘तरुण-भारता’च्या विशेष अंकांतील ‘वैदर्भी रीती’ हा दीर्घ प्रबंध, विदर्भ साहित्य संमेलनाच्या अकोला येथील अधिवेशनांत ‘साहित्यचर्चा’ म्हणून कार्यक्रमांत समाविष्ट झाला होता आणि त्यावरील चर्चा चांगली उद्बोधक व मनोरंजक झाली याची आठवण, संमेलनास उपस्थित असलेल्यांना होईल. विषयाचा खोल व्यासंग, अभिनव व सुबोध मांडणी, विषयाची ऐतिहासिक बाजू पाहणें व रूक्ष विषय सुरस करण्याची हातोटी इत्यादि, प्रा. नानासाहेब देशपांडे यांचे गुण त्यावेळीं श्रोत्यांच्या परिचयाचे झाले. ‘आपल्या साहित्याची ओळख’ करून देतांना, आपल्या पांच व्याख्यानांत, त्यांनी ‘भामहा’पासून तों ‘जगन्नाथ पंडिता’पर्यंत (इ. स. पूर्व ३०० तों इ. स. १७००) ‘संस्कृत साहित्याची’ वाङ्मयीन ओळख आपल्या अधिकारवाणीने इतक्या उत्कृष्ट प्रकारें करून दिली की तेथील सभेंतील श्रोत्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढत गेली व श्रोत्यांच्या आग्रहानिमित्त व्याख्यानाचा एक दिवस वाढविला गेला. ऐतिहासिक दृष्टि, साहित्य व इतर शास्त्रांच्या परस्पर मर्यादा, मूळ ग्रंथांचा खोल अभ्यास, मूल्यमापनाच्या कसोट्यांचा तरतमभाव, व्याख्यानाच्या ओघांत सहज दिसून येणारी पाठांतराची स्मरणशक्ति, मुख्य प्रमेयाकडे श्रोत्यांचें लक्ष वेधून टाकणें, आणि आपल्या मनांतील कल्पना श्रोत्यांच्या गळीं उतरविणें इत्यादि गुणांमुळे त्यांनी सामान्य श्रोत्यांवर आपली छाप पाडलीच पण तेथील उपस्थित पंडितांनाहि त्यांनी भारून टाकलें. अशा प्रकारें प्रा. नानासाहेब देशपांडे प्रांतीय मराठी पंडितांच्या रांगेंतून अखिल महाराष्ट्रीय विद्वज्ज-नांच्या मालिकेंत प्रविष्ट झाले. त्यांना प्राप्त झालेल्या या प्रतिष्ठेबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

सोबती

तारा शास्त्री

माझ्या चिमुकल्या सुषमेची चिमुकली कहाणी आज मी तुम्हाला सांगणार आहें. सुषमेची आणि राजाची! सुषमेच्या पांच वर्षांच्या चिमुकल्या जीवनांत शेवटचीं तीन वर्षं राजा तिचा सततचा साथीदार होता. आज सुषमा नाही आणि म्हणून राजाहि नाही. हो, सुषमा नाही आणि म्हणून सावलीप्रमाणे तिला साथ देणाऱ्या राजालाहि पाठीमागे राहण्याचं कारण उरलं नाही. सुषमेकरता राजा जिवंत राहिला आणि सुषमेकरताच त्याने देह ठेवला.

सुषमेची आठवण झाली म्हणजे नकळत माझ्या डोळ्यांतून आसवांची झिरपण सुरू होते खरी; पण मी रडायचं नाही असं ठरविलं आहे. सुषमेवरील माझ्या आतड्याच्या प्रेमाचं मला डोळ्यावर ताबा न ठेवतां आल्यामुळे, ओघळणाऱ्या आसवांनी, विडंबन करायचं नाही. आतड्याच्या मायेनं, वात्सल्याच्या छायेनं, अंतःकरणाच्या उबेनं, डोळ्यांत तेल घालून चिमुकल्या सुषमेला आम्ही तिघांनी जतन केलं. आम्ही तिघांनी, हो! मी, राजानं आणि सुषमेच्या वडिलांनी. पण एक दिवस असा उगवला—

उगवला कसला? त्या उगवत्या दिवसाबरोबरच सुषमेची प्राणज्योत मावळली. आणि दिवसाच सर्वत्र काळोख झाला. सुषमेचे वडील! दृष्टीने भकास आणि शरीराने दगडासारख्या निश्चल अशा अवस्थेत बसून होते. मी! दुःखानं बेभान होऊन, या जगाची शुद्धच विसरल्यासारखं मला झालं होतं. राजा! राजा तीन दिवसापासून तिच्या पलंगापासून दूर झाला होता; तो आज पहिल्यांदा तिला अखेरचा निरोप द्याकरता घराबाहेर पडला.

त्यानंतरच्या आठ दिवसांत—आणखी आठ दिवस गेले, आणखी वर्षानुवर्षं कालाच्या ओघांत, कुठल्याकुठे गडप होऊन, सुषमेची आज उरली सुरलेली स्मृति, नाहीशी करून टाकतील. मनुष्यमात्राला जन्म-मृत्यूची क्षिति बाळगून, कर्तव्यं मागे टाकतां येत असतात थोडीच? हो, म्हणूनच माझे नित्याचे सारे व्यवहार सुरळीतपणे उरकणं आता मला भाग आहे. सुषमेचे वडील! आईपेक्षा अधिक हळव्या अंतःकरणानं त्यांनी सुषमेला वाढविलं होतं. सुषमेचे कपडे, सुषमेचे खेळ, सुषमेची निजायची जागा, सुंदरतेच्या आणि सुसंस्कृतेच्या हळुवार हातांनी नटविण्याचा त्यांचा नेहमी अट्टाहास असायचा. सौंदर्याच्या सहवासांतून निर्माण झालेलं तें सौंदर्य इतकं अशाश्वत असेल, याची कल्पनाच नव्हती त्यांना. त्या जबरदस्त धक्क्याने, आज आठ दिवस झाले, मी पहातें आहें, ते वाकल्यासारखे झाले आहेत. अबोल झाले आहेत.

राजा—आठ दिवसांच्या सतत उपासानंतर, काल राजानं सुषमेच्या वडिलांच्या हातांत अखेरचे डोळे मिटले. संध्याकाळपासूनच त्याची तगमग सुरू होती. मधूनच बाहेरच्या व्हरांड्यांतून त्याचा आर्तस्वर कानीं येई. बाहेरच्या कुत्र्याशीं भांडण होऊन अंगाला जखम झाली, म्हणजे सुषमेच्या वडिलांना हाक मारून गाऱ्हाणं सांगण्याचा त्याचा एक विशिष्ट स्वर होता. त्याहीपेक्षा आजच्या त्याच्या सुरांतील आर्तता अंतःकरणाला भेदून जाणारी होती. ते उठले. स्वयंपाकघरांतून दूध घेऊन यायला त्यांनी मला सांगितलं. पण दुधाच्या भांड्यांत तोंड घालून दूध पिण्याची इच्छा त्याला दिसली नाही. त्यांनी राजाला मांडीवर घेतलं, आणि चिंधीच्या बोळ्यानं हळूच दूध त्याच्या तोंडांत ओतलं. त्यानं 'था' केला दूध चाटलं आणि त्याक्षणींच डोळे मिटले, ते कायमचे!

सुषमेच्या वडिलांनीहि आपले डोळे मिटले. हळुवार हातांनी, राजाचं केसाळ अंग, त्याची मान, त्याचं तोंड कुरवाळून, त्याला खाली त्याच्या अंथरुणावर ठेवलं. आणि एक मोठा निःश्वास टाकून ते उठले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला सुचत नव्हतं. रडूं बाहेर फुटत नव्हतं. बावरलेल्या चेहऱ्यानं मी त्यांच्या तोंडाकडे पहात होतें. "गेला राजा!—सुषमेकडे गेला—तिला सोबत हवी होती" येवढेच अर्धवट तुटक शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

आणि तेंच खरं! जातांना सुषमेच्या वडिलांना त्यानं अखेरचा निरोप दिला आणि हेंच सांगितलं—सांगितलं, "तुम्ही काळजी करूं नका. सुषमेच्याजवळ आता मी आहें." त्यांनी निःश्वास सोडला तो या निर्धास्तपणाच्या जाणिवेनंच असेल कां? सुषमेनं राजाला अंतर दिलं नाही. राजानं सुषमेला अंतर दिलं नाही. यापुढे आता त्यांची ताटातूट व्हायची नाही. हा त्यांचा पक्का विश्वास होता.

दुधाचा शेवटचा घोट राजानं घेतला. तेवढ्यानं त्याला हुशारी वाटली असती, तर, सुषमेला फार फार विचारलं आहे असं जाण्यापूर्वी त्याला आम्हाला सांगतां आलं असतं? पण, राजाला हें सांगायला हवं होतं, असं थोडंच आहे? त्यांनी राजाच्या अंगावरून हात फिरवला. सुषमेला नेहमीच वरं वाटत होतं त्यामुळे? राजावर कुणी अन्याय केला, तर त्याची दाद मागण्याकरता ती आपल्या पपाकडेच धाव घेत असे ना! सुषमेला आता सुद्धा असंच खात्रीनं वरं वाटलं असेल.

म्हणूनच म्हणतें मी, राजा, तूं गेलास, सुषमेकडे गेलास, तुझ्याकरता आई आता रडणार नाही, म्हणून तिला सांग. आई आणि पपा इथं, आणि तुम्ही दोघं तिथं. कोण जाणे कुठे असाल ते? पण नेहमी बरोबर असा हं! आम्ही दोघं, तुमच्याच आठवणी काढीत, इथे बोलत बसणार. मुळीसुद्धा रडणार नाही. बघ की, राजा आपल्या घरीं आला, मृत्यूच्या दाढेंतून त्याला सोडवून तूं आपल्या घरी आणलंस. त्या दिवसापासूनच्या साऱ्या आठवणी कशा आता घडल्यासारख्या माझ्या डोळ्यासमोरून जात आहेत.

त्या दिवशीं तूं बालकमंदिरांतून परत येत होतीस. रस्त्यांत पोरांच्या घोळक्यांतून एका लहानशा कुत्र्याचं "क्यां—क्यां" असं ओरडणं तुझ्या कानावर आलं. एकदम पार्वतीचा हात सोडून तूं त्या घोळक्याकडे धाव घेतलीस. घरांत त्रास नको, म्हणून आईच्या कुशीं, काढून, कुत्र्याचं पिल्लू नदीच्या पुलाखाली कुणीत सोडून दिलं होतं. रस्त्यावरचीं चार वात्रट कार्टीं जमून त्यांनी त्याचा छळ चालविला होता. कुणी त्याला काठीनं डिवचीत होतं. कुणी त्याचे कान धरून त्याला वर उचलीत होतं, आणि पुनः उंचावरून खाली पाडत होतं. एकानं तर त्याला मध्येच आपल्या पुस्तकांच्या पिशवींत भरलं आणि वरून पुस्तकाचे बंद घट्ट आवळून घेतले. कुत्र्याची तडफड पाहून तूं रडूं लागलीस. लहान-शीच होतीस, पण मोठ्या धिटाईनं त्या कार्ट्यांच्या हातून कुत्र्याला ओढूं लागलीस. पण तीं आडदांड कार्टीं तुला थोडीच दाद देणार होतीं? शेवटी पार्वतीनं मधे पडून, तें पिल्लू त्या पोरांच्या हातून हिसकलं, आणि तुम्ही दोघी घरीं आलांत.

तुझा चेहरा तांबडालाल झाला होता. आसवं वाळून मळला होता, कोमेजला होता. पण त्या पिल्लाला तूं दोन्ही हातांनी कवटाळून धरलं होतंस. त्यानंहि आपली मान विश्वासानं तुझ्या छातीवर ठेवली होती. तुझ्या अंगाला बिलगल्यामुळे त्याला आईच्या कुशींत असल्यासारखं वाटत असावं. पार्वती सांगत होती, "काय करावं बाईसाब, याइन्ला मन्ल, त्येला सोडून द्या, तर ऐकतच न्हात. मन्ल, मी वाहून नेतों डोस्शीवर त्येला. तुमचे हात दुखतीन, पाय दुखतीन. तरी भी ऐकतच न्हांत," मी सुद्धा समजावलं तुला. म्हटलं—"अग सोडून दे त्याला." पण त्या कल्पनेनंच तुला रडूं येत होतं. तूं म्हणालीस, त्याची आई नाही. मीहि त्याला सोडून दिलं, तर त्याला खायला प्यायला कोण घालील? कुत्र्याला कांही जीव नाही कां ग?" तुझं रडूं अनावर होत होतं. शेवटीं पपांनी मध्यस्थी केली आणि त्या आनंदांत त्याच्याकरता दूध काढायला तूं कपाटाकडे धाव घेतलीस.

रात्रीं त्याला अंथरुणांत घेऊन निजायचं असा तूं हट्ट घेतलास. पण मला ती कल्पना अजिबात पसंत नव्हती. 'एवढी मोठी झालें तरी अजून मी सुद्धा तुझ्याजवळ निजतें. मग आईपासून तो दूर झाला आहे त्याला नको कां ग जवळ घ्यायला?" असं तुझं म्हणणं होतं. पण माझा निश्चय पक्का होता. रात्रीं थंडीनं गारठून तो ओरडूं

ला. तुझे पपा उठले. त्यांनी अंथरुणांत त्याला ।पल्या जवळ घेतलं. तेवढ्यांत "मी पपांजवळ निजणार" असा तूं हट्ट घेतलास. त्यांनी माझ्याशीं न बोलतां, मुकाट्यानं तुलाहि आपल्या बिछान्यावर घेतलं. पहाटे मी जागी झालें. एक दीड महिन्याचा तो लोकरीचा गोळा तुम्हा दोघांच्या हाताच्या उबेंत स्वस्थ निजला होता. मला राहवेना. मी खाली वाकून, तूं उठशील याची पर्वा न करतां, तुझ्या कपाळाचा मुका घेतला. " अर्धवट झोपेंत, अर्धवट जागेपणीं माझा राजा ! " असें म्हणालीस तूं !

सकाळीं पपाचं आणि तुझं हितगुज पुन्हा सुरू झालं. "याचं नांव काय काय ठेवणार तूं सुषमा ? " ते म्हणत होते. "चल. आपण आईला विचारूं ? " त्यांचं बोट धरून तूं त्यांना घेऊन घरांत आलीस. काखेंत पिल्लू होतंच. " झोपेंत तर, माझा राजा, माझा राजा, करीत होतीस, आणखीन काय वेगळं नांव ठेवायचं ? " मी म्हटलं. "पण, शेजारच्या देशपाडयांकडे बारसं झालं, तेव्हा तर गोड केलं होतं आई " सुषमा म्हणाली.

" कां ग ? " मी मध्येच म्हटलं. "माणसाचं नांव राजा असतं. कुत्र्याचं नांव सुद्धा राजाच ठेवायचं कां ग ? "

" मग काय झालं ? कुत्रा माणूस नसतो, वाटतं ?" तूं म्हणालीस.

" कुत्रा आणि माणूस ! आम्ही दोघं खूप हसलों. तूं त्यांच्या कुशीत डोकं खुपसलंस. " पपा, बघ नारे ही आई " तूं म्हणालीस.

त्या दिवशीं, नव्या वर्षीत राजाने शिक्रण खाल्ली !

दिवसभर राजाची आणि तुझी दंगामस्ती सुरू असायची. तो घरभर धावत सुटायचा. पायानं ढकलीत, तुझ्यावरोवर चेंडू खेळायचा. तो गुरगुरायचा, निरनिराळे आवाज काढायचा. तूं त्याच्यावरोबर खदखदा हसायचीस. तुझ्या त्या हसण्यावर आम्ही दोघे बेहद्द खूष होतों.

तूं डाळ दाणे खोवरं खेळायला घेऊन, चूल बोळकं मांडायचीस. हा तुझी नजर चुकवून तें सारं खाऊन टाकायचा. तूं रागवायचीस, रडायचीस माझ्याकडे गाऱ्हाणं घेऊन यायचीस. " आई बघ ना ग, राजानं आमचं सारं खेळायचं खाऊन टाकलं. " "त्याला चांगली शिक्षा केली पाहिजे" जराशा करड्या आवाजांत असं मी म्हटल्यावरोबर तुझं रडं एकदम थांबायचं. "आई अग तो गंमत करतो माझी; तुला माहीत नाही. फार खोडकर झाला आहे तो आताशा " तूं म्हणालीस.

आणि सुमा, पिल्ल्या तूं तरी काय कमी कां लबाड होतीस ?

आजकाल, मोठा झाला तसा, सापडेल तें चावायची फार वाईट खोड लागली होती त्याला. कोणचीच वस्तु खाली म्हणून सुरक्षित राहात नव्हती. मी चिडायची, त्याला मारायला लागायची, पण आईच्या हातून स्वतः कधी तूं चापट खाल्ली नव्हतीस. पपा तर तुझी ढालच होते. राजाला सुद्धा कधी चापट मारली जाऊं नये, असा तुझा प्रयत्न असायचा. एक दिवस बाहेरचे कुणी पाहुणे आपल्याकडे बसायला आले होते. परत जातांना ते चप्पल शोधूं लागले. राजाने चपलेचे वरचे पट्टे पार चावून टाकले होते. मी रागावलें. तुला विचारलं, " सांग, याला आता मारूं की नको तें ? " तूं गांगरलीस, पपा खूप हसूं लागले. मलाहि हसूं आवरेना. तेवढ्यांत तुला धीर आला. तूं म्हणालीस, " आई तूं सांगत नव्हतीस कां, की लहानपणी मला जेव्हा दांत येऊं लागले, तेव्हा तुझ्या किल्यांचं चामड्याचं पाकीट दातांनी मी असंच चावत असे म्हणून ? "

" राजाला आईचं पाकीट मिळत नाही, मग काय करील तो बिचारा ! तो आपला दुसऱ्यांच्याच चपला चावतो. खरं की नाही ग सुमा ? " ते म्हणाले.

" हो ना " अगदी गंभीर आवाजांत प्रत्युत्तर करीत तूं म्हणालीस. " आईला त्याची भाषा कळत नाही, म्हणून. " कुई–कुई " आवाज करीत, आपल्याला काय हवं आहे, तें सुद्धा सांगतो तो पपा, खरं की नाही रे ? आपण फिरायला जातों अन् त्याच्या पायांत काटा बोचला, म्हणजे तो सांगतो की नाही तुझ्याजवळ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येऊन? भूक लागली म्हणजे सुद्धा, वेगळाच आवाज काढून सांगतो की नाही तो?"

आणि सुमा तुझं त्या दिवशींच तें बोलणं!

आपल्या लहानशा खुर्चीवर, खुर्चीच्या पाठीला राजाची पाठ टेकवून, खालच्या दोन पायावर, तूं त्याला बैठं केलं होतंस. जवळच्या टेबलाजवळ उभी राहून, पंतोजीसारख्या आवाजांत, तूं त्याला गणित शिकवीत होतीस. तोहि मधून मधून कुई कुईच आवाज काढीत होता. तें दृश्य चोरून पाहिलं आम्ही, आणि तुला आणि त्याला, हो त्यालाहि कुठं ठेवूं अन् कुठं नाही, असं होऊन गेलं आम्हांला.

पुढे होऊन त्यांनी तुला पोटाशीं धरलं. मीहि प्रेमाने राजाचे पुढचे पाय धरून त्याला आपल्या जवळ घेतलं. "राजाला खरोखरच माणूस बनवलं आहे सुमानं" मी त्यांना म्हटलं.

तूं विलक्षण आनंदलीस. आम्हाला विश्वासांत घेऊन अगदी आजीबाईच्या आवेशांत तूं म्हणालीस, "आई, तुला नाही तरी मुलगा नाहीच आहे. राज तुझा मुलगा!" आणि मग लाडक्या आवाजांत "म इक्का आवल्तो माझ्या भाऊलाजा" असं म्हणत त्या खांद्यावर घेऊन तूं घरभर मिरवलीस.

"काय करावं आता ह्या पोरीला?" तुझ्या त्या अनपेक्षित बोलण्याचं नवल वाटून, पण कौतुकानं, माझ्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले. आणि तुझ्या पपांनीहि त्याला साथ दिली.

सुमा, राजाला, त्या तुझ्या भावाला, काल तुझ्या पपांनी शेवटचा निरोप दिला. तो एव्हांना तुझ्याजवळ पोहोचला असेल. आईबाप शेवटीं आपली जबाबदारी आपल्या मुलावर सोपवीत असतात. आम्ही ती राजावर सोपविली आणि निर्धास्त झालों आहोंत. सुमा पुनः आसवं डोळयाबाहेर येऊं लागलीं आहेत, पण मी रडणार नाही. मी फक्त तुला फार फार विचारते आहें.

तुम्ही दोघेहि आम्हांला सोडून गेलांत. जा. चिरंजीव व्हा!

गद्यकाव्य

पाखरूं

—सुरेश डोळके

हृदयाचं पाखरूं भटकायला निघालं आहे.

त्याला आवरून धरण्याचा किती प्रयत्न केला मी. ध्रुवाची आणि शुकाचार्यांची कहाणी सांगून त्याला झोपविण्याचा प्रयत्न केला. डोळयांतल्या गंगालहरींच्या स्तोत्रकुसुमांनी मी त्याची पूजा बांधली. वेदांच्या आणि उपनिषदांच्या मंत्रांचं उपायनहि मी त्याच्यापुढं ठेवलं.

मनुस्मृतीचीं पारायणं...'गीतारहस्या'चं वाचन...

...पण त्यानं आपले पंख पसरलेच. माझ्या शरीराचा कोश अपुरा पडला का त्याला?—

निघालं. गिरक्या घेत. निळया निळया आकाशांत...

कालिदासाच्या अलका नगरींत का चाललं तें? 'मेघदूता'पेक्षाहि अधिक वेगानं?—

—पण झोपलेल्या वाऱ्याच्या मधुर स्वप्नांचा भंग होणार नाही इतक्या हळुवारपणानं!—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

तूं. भुवयांचा तीरकमठा आहेच तुझ्याजवळ
चल. काढ आपल्या बाहुलीचा तीर. लाव त्याच्या टोकाला आपल्या हृदयांतलं हलाहल.
अन् सोड एकदम आपल्या धुंद नजरेचा बाण.
मत्स्यगंधा...
केलंस ना त्या पाखराला घायाळ ? त्याच्या काळजाला भोसकून आरपार गेला तुझा तीर.
तूं त्याला घरीं नेशील—पदराखाली लपवून ! डोळ्यांच्या शिंपल्यांतल्या मोत्याचं पाणी पाजून तूं त्याला सावध करशील.
आशेच्या मंचकावर त्याला झोपवून—
डोळ्यांतल्या फुलवातीच्या मंद प्रकाशांत—
हृदयांतलं अमृत त्याला प्यायला देऊन—
वक्षस्थलाची दुलई पांघरून
भावनेचीं निःशब्द भावगीतं गाऊन—
त्याला झोपवण्याचा प्रयत्न करशील.
आणि मीं जर तें मागितलं तर म्हणशील—
'कुठं आहे तुझं पाखरूं ? माझ्याजवळ ? पण कुठं ? मला सापडत नाही आता.
'माझ्या हृदयापासून तुला तें अलग नाही करतां येणार रे.
स्वप्नांच्या कल्पवृक्षाला
आशेचा हिंदोळा बांधून
अतृप्तीच्या धाग्यानं
त्याला रोज भावगीतं गात असें मी.
पण...
हृदयांतले भाव संपले...
स्वप्नांचा मोहर गळून गेला.
आणि त्याबरोबरच—
अतृप्तीच्या धाग्यानं गुंफलेलं तुझ्या मीलनाचं स्वप्नहि विरून गेलं.
तुला पाहिलं.
आणि सारं, सारं परत आलं.
—शिलाखंडांतून बाहेर आलेल्या अहिल्येसारखं !—
तुला हवंय् ना तुझं पाखरूं ? हें उभं आहे तुझ्यासमोर.
घे. घे. लवकर
आणि आपल्या बळकट बाहुपाशांत, उबदार ओठांजवळ कुशींच्या दुलईंत...
...अगदी घट्ट धरून ठेव त्याला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही कविता

पहाट

अंधाराच्या दुलईला आता बाजूला सारून
येई हलक्या पाउलीं उषा मनीं मोहरून.
वैनगंगेच्या वाहत्या संथ निर्मळ पाण्यांत
पाही सावळें रूपडें स्वप्न निळें आठवीत
दिसतांच स्वप्नखुणा तिचें उजळे ललाट !
निळी लाघवी पहाट !

स्वर्ग चुंबितो धरेला जेथे दिशांच्या ओठांनी
धुंद वैनगंगा येते गात वाहत तेथूनी.
सातपुड्याचा डोंगर—त्याला घालून वळसा
आळवीत सांव भोळा घेते सागराची दिशा.
कृष्ण शिलाखंडांतून वाहे चैतन्याचा पाट !
निळी लाघवी पहाट !

उभी आकाश कडेला खिन्न क्षीण चंद्रकोर
उभी बगळ्यांचो माळ तीरीं एका पायावर.
वाऱ्यासंगें वृक्षवेली गाती देवाला भूपाळी
आणि देवळें पाहती रूप आपुलालें जळीं.
अहो सीमित जीवनीं विश्व बिंबलें विराट !
निळी लाघवी पहाट !

रक्तकमळ तेजाचें पूर्व दिशेच्या गर्भात
त्याच्या कोमल पाकळ्या फुलतील क्षणार्धात
लाल सांडेल पराग देत धरणीला गंध
असें सांगत धावतो थंड वारा अनिर्बंध
कमळाच्या पाशांतून आता भ्रमराला वाट !
निळी लाघवी पहाट !

—वसंत वऱ्हाडपांडे

तुझ्यामाझ्यांतलें प्रेम !

तुझ्यामाझ्यांतलें प्रेम
तुझ्यामाझ्यांत राहूं दे
तुझ्या वत्सल लोचनीं
रूप माझेंच पाहूं दे ! १

तुझ्या नांवाचें चिंतन
निरंतर चालो मनीं !
आणि श्रुति धन्य होवो
तुझ्या अमृत बोलांनी ! २

शून्य भयाण भासतें
विश्व तुझ्याविरहित
आणि तुझ्या सहवासीं
विश्व पहातों शून्यांत ! ३

तुझ्यामाझ्यांत राहूं दे—
तुझ्यामाझ्यांतल्या गोष्टी
ऐकतील सारीजण
भाव लपवून पोटीं ! ४

तुझ्यामाझ्या जगतांत
तुझें माझें कांही नाही !
तुझ्यामाझ्यांतलें उरे
तरी सांगायाचें कांही ! ५

तुझ्यामाझ्यांत नसावें
द्वैत आता कशाचेंच
अद्वैत तें नको पण
असो नातें निराळेंच !! ६

—म. ना. सरपटवार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मृतीचें तर्पण !

सोन्याचा संसार
गृहिणी सुंदर !
पांगळा श्रीकृष्ण
रांगे घरभर ! १

दुधासाठी त्याला
घेतली मी गाय,
अर्धांगीचा हर्ष
अंतराळीं जाय ! २

काढोनिया घार
नेतां चरावया
परते मधून
वत्साला पहाया ! ३

त्रासला गोपाळ
देई तिला मार !
दिसली नयनीं
तिच्या अश्रुधार ! ४

होऊन हताश
जड पावलांनी
सोडून वत्साला
निघाली ती वनीं ! ५

जड तिची काया,
जड तिचें मन !
द्रवलें हृदय
दृश्याने दारुण !! ६

आठवली 'आई'
आठवलें प्रेम !
असेंच वळाने
नेई तिला यम !! ७

खपली निघाली
स्मृती जागवून !
अश्रुंनीच केलें
स्मृतीचें तर्पण !! ८

—ना. मा. सरपटवार

सम्पलें ग रामायण !

आज व्हायचें होतें
होतें नको जें व्हावया
आज सम्पायचें होतें
होतें नको जें सम्पाया

होता व्हायचा आज
ओल्या क्षणांचा आठव
क्षण फुलायचा होता
जाई जुईचा माण्डव...

होतें सांगायचें आज
याच 'वेडया घरे'ला न–
आज पासून आमुचें
सम्पलें ग रामायण !!

—प्र. रा. देशपांडे

बंदिस्त !

शब्दांवाचून बंदिस्त
आज प्रक्षुब्ध भावना
तिला वाटतें तोडावें
साऱ्या कृत्रिम बंधना.

क्षीण पंख जाहलेले
ओढ झेप मारण्याची
घाली भुरळ घरटें
तृषा नीलिमा पिण्याची.

वेग अनावर परी
बद्ध जळ कातळांत
किनाऱ्याच्या सीमेवरी
फुटे लाटेवर लाट.

—गुणाकर देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुझ्याकडे

[छन्द–वैकुण्ठ]

आज तुझ्याकडे मला यायचें—यायचें !
डोळे भरूनी नि तुला पाह्यचें—पाह्यचें !

हालवीन दोन्ही दण्ड, ओळख हं मला—
नाहीतर बरें नाही व्हावचें—व्हायचें !

दोन्ही कर तुझे माझे कपोलीं ठेऊन
दोघांनीहि प्रेम मूक द्यायचें—घ्यायचें !

पेरांमाजी पेर गुंफूनिया गे आपण
पुन्हा कधी अलग ना व्हायचें—व्हायचें !

कटीभंवती ग तूं मी टाकूनी या हात हे
गर्रर गिरक्याच घेत राह्यचें—राह्यचें !

गालावरी हळू तुझ्या चापटी मारून
धुन्दीमधी चाळवीत न्यायचें —न्यायचें !

अधरांशीं अधर हे हळूच लावून
प्रेमगीत अधरांचें गायचें —गायचें !

माझ्या हृदयांत तूं ग हृदयीं तुझ्या मी
उद्यानांत एकान्तांत राह्यचें —राह्यचें !

हृदयाशीं हृदयाला स्पन्दून देऊन
एकमेक एकरूप व्हायचें —व्हायचें !

—ज्योत तडतडते ग, भङगशीं स्वप्न का ?
चंचले ! मी कुठे मग जायचें —जायचें ?

—निशिकान्त करकरे

आली पहाट लाजत

आली पहात लाजत
मंद मंथर गतीने शुक्रताऱ्याच्या तेजांत
आणि तांबुस कोवळें कांही हाललें गुपित
पूर्वदिशेच्या कुशींत

हिरव्या तृणां–पानांवर
जागजागीं नियळत ओथंबलें दंहीवर
उमलत्या फुलांतला ओला सुगंध पिऊन
मारी लहरा पवन

कळ्या शहारल्या खुळ्या
अर्ध्या जागृतींत अर्ध्या स्वप्नतंद्रीमध्ये निळ्या
कुठे कमलदलांत निद्रीतच परी भृंग
गोड ग्लानीमध्ये गुंग

जळ नितळ लहरे
मंद मंद तरंगांत गंध फेनाचा थरारे
पुलकीत किनाऱ्याच्या अधरावर लकेर
निळी तरळे मदीर

धरा पडली लोळत
स्वप्न–चांदणें अजून घोळवीत लोचनांत
तृप्त केशरी प्राचीस हलकेंच जागवून
उभी पहाट लाजून

—उ. रा. गिरी

बघ ना अता अंत

[भीमपलास]

बघ ना अता अंत ! भारावलें ऊर
ही सांज्य वेळा अशि पावसाळी
त्या मेघ बाला वरि अंतराळीं
शून्यांबराला घेवोनि जवळी
गानाश्रुमाला त्यालागिं गावोनि
शमवीति त्याचें निस्संग अंतर
बघ तूंहि ना अंत भारावलें ऊर.

पायांतळीं सारि घालोनि अवनी
व्याकूळ हा ऊर एकाकि घेवोनि
रीतेच राहोनि आली परतोनि
सांध्यक्षणीं द्वारिं अश्रू भरोनी
आता तरी येई द्यायास धीरास
बघ ना अता अंत भारावलें ऊर

धावोनि येतील या वारिधारा
आलिंगनी शाम अवनी अधीरा
तूं ये भरोनी या वारि धारांत
शून्यांबराचा मिटप्या पसारा
ये ये अता या मौनावकाशांत
बघ ना अता अंत भारावलें ऊर.

—वसंत माधव

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बौद्धपूर्वकालीन वैदिक वाङ्मय व बुद्धाची शिकवण

लेखक: पुं. गो. मुंघाटे, बी. ए., नागपूर

बौद्ध–धर्म हा हिंदुधर्मापेक्षा वेगळा व स्वतंत्र असा धर्म नसून तो हिंदू धर्माचाच एक भाग आहे असें हिंदु पंडित प्रतिपादन करतात; तर बौद्ध–धर्मीय "बुद्ध धर्म" हा स्वतंत्र व हिंदुधर्मापेक्षा पूर्णपणे वेगळा व स्वतंत्र असा आहे, असें प्रतिपादन करतात. कांही असो, पण हिंदु-धर्माचें सर्वांगीण ज्ञान झाल्याशिवाय किंवा वैदिक–धर्म व हिंदु–दर्शनें यांचें नीट आकलन झाल्याशिवाय बौद्ध–धर्माचें खरें स्वरूप कळणें हें जवळ जवळ अशक्यच आहे. कारण वैदिक वाङ्मय व दर्शनें यांच्या मंथनांतूनच भगवान बुद्धाने आपला नवीन धर्म प्रस्थापित केला. म्हणून वैदिक धर्माचा व भिन्न भिन्न दर्शनांचा या ठिकाणीं विचार करणें अगदी अगत्याचें आहे.

मंत्र ब्राह्मण व उपनिषदें

बुद्धपूर्वकालीन वैदिक वाङ्मयांत चार वेदांचा अंतर्भाव असून प्रत्येक वेदाचे पुनः तीन भाग केले आहेत. त्यांना मंत्र, ब्राह्मण व उपनिषदें असें म्हणतात.

मंत्र—मंत्रांचा काळ* इ. स. पूर्व १५००–१२०० चा आहे. यांत इंद्र, अग्नि, वरुण, मित्र (सूर्य) यांना संतुष्ट करण्याकरिता ऋषींनी रचलेलीं स्तुतिगीतें व प्रार्थना यांचा समावेश आहे. या स्तुति–गीतांचा व प्रार्थनांचा वेदाच्या पहिल्या भागांत समावेश होतो. हीं गीतें प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखांतून निघालेलीं वचनें आहेत असा वेद-निर्मित्यांचा समज असल्यामुळे त्यांना श्रुति असें म्हणतात. सर्वांत पहिली व प्रमुख श्रुति ऋग्वेद ही होय व यांत स्तुतिगीतांचा समावेश केला आहे.

ब्राह्मणः—ब्राह्मणांचा काळ स्थूलमानाने इ. स. पूर्व १०००–८०० असा आहे. या ब्राह्मणांत प्रत्येक यज्ञाकरिता कोणता उत्सव व विधि करावा या संबंधीचें वर्णन आहे. तद्वत्‌च माणसाच्या बऱ्यावाईट कर्माप्रमाणे बरावाईट पुनर्जन्म मिळतो अशी पुनर्जन्माची अंधुक कल्पना देखील या ब्राह्मणांत आहे‡.

उपनिषदें:—ब्राह्मण ग्रंथांच्या बरोबरच वैदिक–वाङ्मयांत उपनिषदांचा अंतर्भाव होतो. या उपनिषदांची संख्या २३५ असून जुनीं उपनिषदें बुद्धापूर्वीचीं आहेत.† बुद्धापूर्वी निर्माण झालेलीं हीं उपनिषदें, आत्म्याचें शरीरापासून बाह्य अस्तित्व सत्य आहे असें मान्य करतात; आत्मा हा अनादि असून त्याला आरंभ व शेवट नाही; पण प्रकृतीचा जेव्हा आत्म्याशीं संयोग होतो तेव्हा त्यांत चैतन्य निर्माण होतें असें प्रतिपादन करतात. आत्मा व प्रकृति यांची युति हेंच सर्व मानवांच्या दुःखाचें कारण आहे; जोंपर्यंत आत्म्याला मी प्रकृतिपासून स्वतंत्र आहें, असें ज्ञान होत नाही तोंपर्यंत आत्म्याची प्रकृतीच्या बंधनापासून सुटका होत नाही. मी या प्रकृतीपासून स्वतंत्र आहे; प्रकृति माझ्यासमोर रंगभूमीवरील नटीप्रमाणे नृत्य करते व मला फसवते, असें जेव्हा आत्म्याला स्वतः-बद्दल ज्ञान होतें तेव्हा प्रकृति आपलें नृत्य आपोआप बंद करते व आत्म्याला मुक्ति प्राप्त होऊन तो परब्रह्मांत एकरूप होतो.

ही जुन्या उपनिषदांची शिकवण वेदांशीं विसंगत आहे. असो. पण नवलाची गोष्ट अशी की जुन्या उपनिषदांतहि आत्मा भौतिक आहे की अभौतिक आहे, मूर्त आहे की अमूर्त आहे यासंबंधी मतभेद आहेत.

---

* Sir H. S. Gour–The spirit of Buddhism, p. 4.

‡ 1 Sir H. S. Gour–The spirit of Buddhism, p. 4.

† 2 Sir H. S. Gour—The spirit of Buddhism, p. 5.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही उपनिषदांनी आत्मा हा शरीराच्या आंत दडून बसला असतो व शरीराच्या चलनवलनाला तोच कारणीभूत असतो असें प्रतिपादन केलें आहे.* जिवंत शरीरांत तो हृदयाच्या आंत असतो; तो भौतिक पदार्थासारखा आहे. कांही ऋषींच्या मताप्रमाणे तो तांदुळाच्या किंवा 'यवा'च्या दाण्या एवढा असतो.† त्याची रचना ही भौतिक असून तो माती, पाणी, अग्नि व वायु यांचा बनलेला असतो. पण हें मत कांही निश्चित नाही; कारण कांही सूत्रांत तो चैतन्य, मन, अहंकार इत्यादि अभौतिक वस्तूंचा बनलेला आहे असें प्रतिपादन केलें आहे. असो. पण जुन्या उपनिषदांच्या मताप्रमाणें हें मत अगदी स्पष्ट आहे की आत्मा हा शरीरापासून वेगळा आहे. निद्रावस्थेंत तो शरीराच्या बाहेर पडतो व स्वप्नसृष्टि तयार करतो. ज्या माणसाची भौतिक जगाची आसक्ति नष्ट होते त्या माणसाचा आत्मा हा ब्रह्माशीं एकरूप होऊन, तादात्म्य पावतो. यज्ञयागादि कर्में केल्याने व देवतांना निरनिराळे बली दिल्याने मनुष्याला स्वर्ग मिळतो हें वेदांचें तत्त्व उपनिषदांना मान्य नाही. भगवान बुद्धालाहि उपनिषदांचें हें तत्त्व मान्य आहे व म्हणूनच कांही टीकाकार उपनिषदांची शिकवण ही बुद्धाची शिकवण आहे; बुद्धाने लोकांना नवीन कांही सांगितलें नाहीं असें म्हणतात; पण हा आरोप पूर्णपणें सत्य नाही. असो.

बुद्धापूर्वीची हिंदु-दर्शनें

पण बुद्धधर्माच्या पार्श्वभूमीचा किंवा बुद्धपूर्वकालीन धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास करतांना हिंदुस्थानांत बुद्धापूर्वी आणखी कोणतीं दर्शनें अस्तित्वांत आलीं होतीं व बुद्धधर्माचा त्यांच्याशीं काय संबंध आहे याचा विचार करण्याकरिता त्या दर्शनांचाहि येथे परामर्ष घेणें विषयाला सोडून होणार नाही.

बौद्धांनी ६४ दर्शन-पद्धतींचा अभ्यास केला व त्यांना टाकून देखील‡ दिलें. हिंदूंनी सहा मुख्य दर्शन-पद्धती मान्य केल्या. (१) वेदान्त-(याला उत्तर मीमांसा देखील म्हणतात; याचा संस्थापक व्यास.) (२) मीमांसा (ही वेदान्तावर टीका आहे; संस्थापक जैमिनी) (३) न्यायदर्शन-याचा संस्थापक गौतम ऋषि (गौतम बुद्ध नाही) (४) सांख्य दर्शन-संस्थापक कपिल मुनि. (५) वैशेषिक-सं० कणाद. (६) योग-सं० पातंजल मुनि.

वरील दर्शनांच्या संस्थापकांनी दुःखाचा नाश करण्यासाठी यज्ञयागादि कर्में करण्याची जरूर नाही; अज्ञान दूर झालें म्हणजे आत्यंतिक मुक्त मिळतें असें प्रतिपादन केलें आहे. म्हणून वेद व दर्शनें यांच्या तत्त्वांत आमूलाग्र फरक आहे. वेदांत इंद्र, वरुण, प्रजापति इत्यादि देवतांच्या स्तुतिसुमनांशिवाय व निरनिराळे यज्ञ करण्यास निरनिराळे विधि व उत्सव यांच्या उल्लेखाशिवाय कांही तत्त्वज्ञान नाही. ब्राह्मणांच्या यज्ञयागादि कर्मांत व मंत्रांत अशी चमत्कारिक शक्ति आहे की त्या पुढे इंद्र, अग्नि, प्रजापति वरुण इत्यादि देव देखील शरण येतात; व म्हणून ब्राह्मणांना देवांपेक्षाहि अग्रस्थान दिलें पाहिजे अशी विचारसरणी वेदांत आहे.* बुद्धांनी जेव्हा वेदांचा पूर्णपणें अभ्यास केला तेव्हा त्यांना वेदांचा फोलपणा लक्षांत आला व त्यांनी वेद-प्रामाण्यावर कसून प्रहार करणें सुरू केलें.

वर लिहिलेल्या हिंदु-दर्शन पद्धतींपैकी किती दर्शनें बुद्धापूर्वीचीं होतीं, त्यांचीं मतें कोणतीं व त्यांचा गौतम बुद्धावर कोणता परिणाम झाला यांचा स्थूलमानाने अभ्यास करणें या ठिकाणीं अनाठायीं होणार नाही.

वेदान्त दर्शनाच्या तीन शाखा आहेत. (१) अद्वैत (२) द्वैत (३) विशिष्ट अद्वैत. अद्वैत दर्शनाचा मुख्य पुरस्कर्ता शंकराचार्य. तो इ. स. नंतर नवव्या शतकांत झाला. द्वैत दर्शनाचा संस्थापक माधवाचार्य. हा इ. स. तेराव्या शतकांत झाला. विशिष्ट अद्वैताचा नेता रामानुज. हा अकराव्या शतकांत झाला. अर्थात् हें दर्शन बुद्धानंतर विकास पावलें असल्यामुळे बुद्ध-दर्शनावर या दर्शनाचा कांहीच परिणाम झाला नाही.

* 1 Sir H. S. Gour—The spirit of Buddhism, p. 18.

† 2 Sir H. S. Gour—The spirit of Buddhism, p. 19.

‡ The spirit of Buddhism, p. 6.

* Dr. Oldenberg (German Scholar) —Buddhism, p. 19.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उलट शंकराचार्यांनी बुद्धापासून बरेंच उसनें घेतलें आहे असें सिद्ध करावयास बराच पुरावा आहे. असो. या दर्शनाबद्दल जास्त लिहिणें इष्ट होणार नाही; पण या दर्शनाची देखील थोडक्यांत माहिती असायला हवी म्हणून थोडक्यांत परिचय करून देणें समर्थनीय आहे. अद्वैत मताप्रमाणे सर्व विश्वांत एकच आत्मतत्त्व आहे. यालाच त्यांनी ब्रह्म असें म्हटलेलें* आहे. ब्रह्म व मनुष्याचा आत्मा हा एकच आहे.† भौतिक सृष्टि ही ब्रह्माची माया होय. मोक्षानंतर आत्मा ब्रह्माशीं एकरूप होतो. मुख्य तत्त्वासंबंधी या तीन दर्शनांत मतभेद आहे. द्वैतवादी ईश्वर, आत्मा व प्रकृति‡ हीं तीन भिन्न व स्वतंत्र तत्त्वें आहेत. असें मानतात. त्याचप्रमाणे आत्मा प्रकृतीच्या बंधनांतून सुटल्यावर परमेश्वरांत किंवा ब्रह्मांत विलीन होतो असेंहि मानतात. असो. न्याय, वैशेषिक, योग आणि पूर्व मीमांसा हीं दर्शनें इतर बाबतींत जरी भिन्न असलीं तरी "मोक्ष" या परमश्रेष्ठ मानवी साध्या-संबंधी सर्वांत एकवाक्यता आहे.

सांख्य-दर्शन

बौद्धा पूर्वी जे अत्यंत महत्त्वाचें दर्शन अस्तित्वांत होतें व ज्या दर्शनाच्या अज्ञेयवादाचा (agnosticism) व नास्तिक वादाचा बुद्धाच्या मतावर भयंकर परिणाम झाला तें दर्शन म्हणजे कपिल मुनींचें "सांख्यदर्शन" हें होय. म्हणून त्या दर्शनाचा येथे थोडक्यांत अभ्यास केलाच पाहिजे.

सांख्य-दर्शन हें बुद्धाच्या कांही शतकांआधी अस्तित्वांत आलें. (निश्चित काळ सांगतां येत नाही) या दर्शनाची शास्त्रीय अशी मांडणी केलेली आहे. सांख्य ईश्वराचें अस्तित्व मान्य करित नाही. विश्वाची उभारणी व वृद्धि पुरुष व प्रकृति या दोन स्वतंत्र व प्रमुख तत्त्वांमुळें झाली असें कपिल मुनि आपल्या सांख्य दर्शनांत

* H. S. Gour. The spirit of Buddhism, p. 10.
† Dr. Oldenberg–Buddhism, p. 26
‡ H. S. Gour–The spirit of Buddhism, p. 24

प्रतिपादन करतात. पुरुष व प्रकृति या खेरीज सर्व वस्तु अशाश्वत* आहेत. पुरुष व प्रकृति हीं दोन्ही स्वतंत्र आहेत. पण विश्वाची उभारणी व वृद्धि करण्याकरितां हीं दोन्हीं तत्त्वें एकत्र येतात. पुरुष असंख्य आहेत. पुरुष व प्रकृति यांचा संयोग हाच पुनर्जन्माचें व सर्व विश्वाच्या दुःखाचें कारण आहे. पुरुष हा निर्गुण तर प्रकृति सगुण आहे. जेव्हा पुरुषाला, मी प्रकृतिपासून स्वतंत्र आहें, असें ज्ञान होतें तेव्हा तो प्रकृतीच्या बंधनांतून मुक्त होतो. ब्रम्हदेवापासून सर्व जगाची उत्पत्ति झाली ह्या वेदान्तिक तत्त्वज्ञानावर सांख्यांचा कटाक्ष आहे.†

बुद्धाला जरी सांख्यांचा हा अज्ञेयवाद व नास्तिक-वाद मान्य असला तरी त्याला सांख्याची पुरुष व प्रकृति हीं नित्य अशीं तत्त्वें मान्य नाहीत. कारण जगांतील प्रत्येक वस्तु ही क्षणिक असून परिवर्तनशील आहे असें बुद्ध म्हणतात. उदाहरणार्थ, पाण्याचा प्रवाह हा जरी एकच दिसत असला तरी त्यांत सतत व अव्याहत बदल होत असतो. तसेंच सूर्याचीं किरणें नित्य व अव्याहत निघतांना दिसतात; पण तीं तींच किरणें नसून त्यांत अव्याहत व क्षणोक्षणीं बदल होत असतो. असो.

वर चर्चिलेल्या धर्मग्रंथांनी व दर्शनांनी बुद्धाच्या मनाचें मुळीच समाधान झालें नाही. मानवतेच्या दुःखाचें मूळ त्याला त्यांत सापडलें नाही. वेदांची शिकवण त्याला मुळीच आवडली नाही, इंद्र, वरुण, अग्नि, प्रजापति इत्यादि देवांना खूष करण्यासाठी यज्ञांत प्राण्यांची हिंसा करणें हें त्याला मुळींच पटलें नाही. ब्राह्मणांच्या मंत्रांपुढे सर्व देव शरण येतात व म्हणून देवापेक्षा अधिक मान ब्राह्मणांना द्यावा हा "ब्राह्मण-धर्म" बुद्धाला मुळीच आवडला नाही. व म्हणून बुद्धानें वेदांवर व ब्राह्मणांवर सडकून टीका केली. बुद्धापूर्वी कपिल मुनीने देखील यज्ञयागादि कर्मांवर टीका केली व चार्वाक या अस्सल नास्तिकाने देखील वेदांवर व

* H. S. Gour–The spirit of Buddhism, p. 24
† Mr. Blantun–Sānkhya Kārikā, (Translated) p. 353

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यज्ञयागादि कर्मांवर टीका केली; पण लोकजागृती-करिता व धर्माचें खरें सत्य लोकांना कळावें याकरिता बुद्धाने जो पुढाकार घेतला तो कोणीच घेतला नाही व म्हणून बुद्धाला अधिक श्रेय देणें केव्हाहि इष्ट ठरेल.

बुद्धपूर्वकालीन व समकालीन जाति-व्यवस्था

बुद्धाने जातिभेदावर देखील आपलें शस्त्र उचललें आहे. बुद्धाच्या पूर्वी व बुद्धाच्या काळीं जातिव्यवस्था आजच्या सारखी नव्हती आज ज्या हजारो जाति दिसतात त्या बुद्धाच्या काळीं नव्हत्या. बुद्धाच्या काळीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारच प्रमुख जाति होत्या. (शूद्र वर्ग हा केव्हा अस्तित्वांत आला, शूद्र मूळचे कोण, वगैरे बाबतींत इतिहासकारांत मतभेद असल्यामुळे त्या वादांत या ठिकाणीं पडणें इष्ट नाही) पैकी वरील तीन जातींत रोटीबेटीव्यवहार होत असत. पण कालांतराने प्रत्येक जात ही स्वयंपूर्ण बनत चालल्यामुळे रोटीबेटीव्यवहार बंद झाले. ब्राह्मणांना ही व्यवस्था फायदेशीरच झाली व त्यांनी या जातींची उत्पत्ति आपल्या कल्पनेप्रमाणेच लावली. उदा० ब्राह्मण हे परमेश्वराच्या मुखांतून निर्माण झाले, क्षत्रिय बाहूंतून, वैश्य पोटांतून व शूद्र पायापासून निर्माण झाले.* ही काल्पनिक उत्पत्ति अर्थात् बुद्धाला बिलकूल आवडली नाही व त्याने ह्या काल्पनिक उत्पत्तीवर भयंकर टीका केली. असो.

वरील सर्व बुद्धपूर्वकालीन भारताची धार्मिक व सामाजिक परिस्थिति लक्षांत घेतां बुद्धाने कोणता मार्ग अवलंबिला, कोणत्या धर्माची शिकवण त्याने लोकांना दिली, त्याचें तत्त्वज्ञान कोणतें, वेदांच्या शिकवणुकीवर त्याने कोणता रामबाण उपाय शोधून काढला, वगैरे सर्व गोष्टींची चर्चा प्रस्तुत लेखांत करणें क्रमप्राप्तच आहे.

बुद्धाची शिकवण

वैदिक ऋषींप्रमाणें बुद्धाने आपली शिकवण पुस्तकरूपाने लिहून ठेवली नाही; त्याची शिकवण ही तोंडी होती, आपल्या प्रवचनांचा एक नवीन धर्म अस्तित्वांत यावा, एक नवीन दर्शन अस्तित्वांत यावें किंवा एक शास्त्र निर्माण व्हावें, असा बुद्धाच्या मनांत उद्देश नव्हता व म्हणूनच बुद्धाचा धर्म हा धर्महि नाही, दर्शनहि नाही शास्त्रहि नाही असें सर हरिसिंग गौर * यांनी आपल्या पुस्तकांत "बुद्ध-दर्शना" संबंधी लिहितांना म्हटलें आहे. तें एका दृष्टीने खरेंहि आहे, कारण बुद्धाची शिकवण ही तोंडी असल्यामुळे त्यांनी आपल्या धर्माची, मतांची व्यवस्थित व तर्कशुद्ध अशी मांडणी केलेली नाही. शिवाय त्याने प्रतिपादन केलेलीं मतें निश्चित नसून संदिग्ध स्वरूपाचीं आहेत. अशोकाच्या काळा-पासून (इ० स० २५०) बुद्धाच्या श्रुति लिहिल्या गेल्या असाव्या असें इतिहासकार व दार्शनिकांचें मत † आहे. बुद्धाच्या प्रवचनाचें सार ज्या मूळ ग्रंथांत लिहिलें गेलें त्यांना "त्रिपिटकें" असें म्हणतात. (१) विनय-पिटक-संघाच्या शिस्तीचें पुस्तक (२) सूत्त (सूत्र) पिटक यांत अनेक म्हणी (aphorisms व नीतिनियम (moral-laws) यांचा समावेश होतो. या सुत्तांत "जातकांचा" देखील समावेश होतो. व या जातक ग्रंथांत बुद्धाच्या गतजन्मांच्या मजेदार गोष्टी देखील सांगितल्या आहेत. (३) तिसरें पिटक अभिधाम-यांत बुद्ध दर्शनाचे पूरक-ग्रंथ आहेत. (dissertations); हे सर्व ग्रंथ पाली भाषेंत लिहिले आहेत व यांतच गौतम बुद्धाचा आत्मा आहे. बुद्धाने आपला धर्म संस्कृत भाषेंत सांगण्यास मुद्दामच टाळलें. लोकभाषेंत आपलें प्रवचन करणें अधिक चांगलें हें बुद्धाने आधी ओळखलें. एकदा बुद्धाकडे त्यांच्या प्रमुख दोन शिष्यांनी तक्रार केली व ते बुद्धाला म्हणाले, "भगवन्, तुम्ही आपल्या धर्माची शिकवण सर्वश्रेष्ठ अशा संस्कृत भाषेंत कां करीत नाही ?" तेव्हा बुद्ध उत्तरले, "माझा धर्म हा सर्वसाधारण लोकांकरिता आहे, तेव्हा तो त्यांच्याच भाषेंत सांगितलेला उत्तम. माझा धर्म मी संस्कृत भाषेंत सांगणार नाही व त्याचें संस्कृतांत भाषांतर देखील होऊं देणार नाही. मी तुम्हाला बजावून सांगतों की बुद्धाचा शब्द हा आप-ल्याच मायभाषेंतून किंवा प्रादेशिक भाषेंतून शिकायचा

*ऋग्वेद, दहावें मंडल, १९ वा श्लोक (पुरुष सूक्त)

* Sir H. S. Gour-The spirit of Buddhism, p. 274

† „ p. 34

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे." श्री. स्पेन्स हार्डी* यांच्या मताप्रमाणें बुद्ध धर्माचें वाङ्मय जगांतील कोणत्याही धार्मिक वाङ्मयापेक्षा अधिक आहे; तर ऱ्हिस डेव्हिस† यांच्या मताप्रमाणें बुद्ध-धर्माचें इंग्रजी भाषांतर बायबलापेक्षा चारपट अधिक आहे. असो.

बुद्धाच्या प्रवचनाचें सर्व सार "चार सत्यें व अष्टांगिक मार्ग" यांत आहे. जेव्हा बुद्धाला आपली शिकवण सोप्यांत सोप्या व कमींत कमी शब्दांत सांगण्यास लोक आग्रह करीत असत तेव्हा ते त्यांना चार सत्यें व अष्टांगिक-मार्ग सांगत असत. हीं चार सत्यें कोणतीं?

(१) पहिलें सत्य मनुष्याचें जीवित क्षणिक असून दुःखमय आहे.

(२) दुसरें सत्य मानवाच्या दुःखाचें कारण शोधून काढणें.

(३) तिसरें सत्य दुःखाची आत्यंतिक हानि करण्यासंबंधी आहे.

(४) चवथ्या सत्यानें दुःखाची आत्यंतिक हानि करण्याकरितां मध्यम मार्ग शोधून काढला आहे.

अंतिम-सुखाकरितां शरीराचे चोचले पुरवूं नये व शरीराला विनाकारण कष्ट देखील देऊं नये असा हा मध्यम-मार्ग निर्वाण प्राप्तिकरितां भगवान बुद्धानें सांगितला. तप, उपोषण, अंधविश्वास, भोळसटपणा व यज्ञयागादि कर्में यांवर बुद्धानें कसून प्रहार करून त्या ऐवजी अष्टांगिक-मार्ग सांगितला. हा अष्टांगिक‡ मार्ग म्हणजे (१) सम्यक् श्रद्धा (Real faith) (२) सम्यक् ध्येय (३) सम्यक् भाषण (४) सम्यक् आचरण (५) सम्यक् जीवन (६) सम्यक् प्रयत्न (७) सम्यक् विचार (८) सम्यक् समाधि-अंतर्निरीक्षण (introspection). पैकीं पहिलीं चार तत्त्वें साधारण लोकांच्या आचरणाकरितां होतीं व दुसरीं चार तत्त्वें भिक्षूंच्या आचरणाकरितां होतीं. कोणत्याहि समाजाचें नैतिक संवर्धन होईल अशाप्रकारचे हे आठ मार्ग आहेत. आणि बुद्धानें देखील स्वतःचें व स्वतःच्या समाजाचें नैतिक संवर्धन कसें होईल, मनाची शुद्धता कशी करतां येईल याखेरीज दुसरें कांहीं सांगितलें नाहीं असें विधान केल्यास तें पूर्णपणें असत्य व सदोष होणार नाहीं. आज विसाव्या शतकांत महात्मा गांधींच्या मनांत एखादा नवीन वाद निर्माण करण्याची ज्याप्रमाणें इच्छा नव्हती त्याचप्रमाणें गौतम बुद्धाला देखील आपल्या प्रवचनांचा व शिकवणुकींचा एखादा धर्म किंवा शास्त्र निर्माण व्हावें अशी इच्छा नव्हती. वैदिक देवतांची पूजाअर्चा केल्यानें मनाला खरी शांति मिळणार नाहीं, निर्वाणप्राप्तीचा व दुःखनिरसनाचा मार्ग हा वेदांशीं विसंगत आहे हें बुद्धानें पूर्णपणें जाणून आपल्या धर्माची सर्व इमारत नैतिक मूल्यांवर उभी केली. मेल्यानंतर आपलें काय होईल, या जगाचा नियंता कोण, आत्मा आहे की नाहीं, स्वर्ग कुठ आहे व त्यांत प्रवेश कसा मिळवतां येईल, वगैरे विवाद्य वादांत बुद्ध शिरले नाहीत. व त्यांनी आपण सर्व या जगांत सुखानें व गुण्यागोविंदानें कसें राहूं, सर्व जगाला सुखी कशा रीतीनें करतां येईल व निर्वाणप्राप्तीकरितां सर्व दुःखांचें मूळ कसें उपटून बाहेर काढतां येईल, यासंबंधीच जास्त चर्चा केली आहे. लोकांचीं मनें जबरदस्तीनें पालटवून आपल्या संप्रदायांत किंवा लोकसंग्रहांत कसें आणावें याकडे बुद्धानें बिलकूलच दुर्लक्ष केलें व तसा त्यांचा उद्देश देखील नव्हता. पण बुद्धानंतर त्यांच्या शिष्यांनी त्याच्या उपदेशांचा एक स्वतंत्र धर्म, दर्शन किंवा शास्त्र तयार केलें यांत बुद्धाचा कांहीं दोष नाहीं.

बुद्धाचीं नैतिक तत्त्वें

बुद्धाचें सर्वांत प्रमुख व मूल्यवान नैतिक तत्त्व म्हणजे मनाची शुद्धता करणें. या नीतींत व ब्राह्मण-धर्मांत फरक आहे. ब्राह्मणधर्मांत किंवा वेदांत नीतीला जास्त महत्त्व नसून कर्मकांडाला जास्त महत्त्व आहे. इंद्रियनिग्रह करणें ही बुद्धाची शिकवण, तर स्वतःचा त्याग करणें (Self-sacrifice) ही ब्राह्मण-धर्माची शिकवण आहे. बुद्धानें धर्माच्या बाह्य स्वरूपाला व सोंगढोंगाला मुळीच महत्त्व दिलें नाहीं. त्यांनी केलेल्या नैतिक उपदेशाचें सार खालीलप्रमाणें सांगतां येईल:—

* Spence Hardy—Eastern Monachism—p. 190
† Rhys Davids—Buddhism, p. 20, 21.
१ धम्म सत्य प्रवचन सुत्त १–८

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१ प्राण्यांची हिंसा करूं नये.
२ चोरी करूं नये.
३ परस्त्रीगमन करूं नये.
४ खोटें बोलूं नये.
५ मद्यपान करूं नये.

ख्रिस्ती लोकांनी व मनुस्मृतिकाराने हीं तत्त्वें तंतोतंत आपल्या धर्मग्रंथांत घेतलीं आहेत. मनुस्मृति * ही इ. स. च्या चवथ्या शतकांत लिहिली गेली असावी असें डॉ. भांडारकर यांचें मत आहे. असो.

वरील आज्ञा सर्वसाधारण लोकांकरिता आहेत व "जे लोक स्वतःच्या जीवनाचा नाश करतात, खोटें बोलतात, चोरी करतात, परस्त्रीगमन करतात व मद्यपान करतात ते लोक याच जगांत स्वतःच्या मृत्यूचा खड्डा खोदतात"† असें स्पष्ट म्हटलें आहे.

भिक्षूंच्या पालनाकरिता आणखी पांच आज्ञा बुद्धाने सांगितल्या आहेत. त्या सर्वांचा समावेश "निषिद्धशीलांत" केलेला आहे. त्या आज्ञा किंवा नियम खालील होतः—

(६) भिक्षूंनी ठराविक वेळांशिवाय जेवण करूं नये.

(७) उत्तम पोषाख व दागिने घालूं नये; सुगंधित वस्तूंचा उपयोग करूं नये.

(८) नरम व मऊ बिछान्यावर भिक्षूंनी झोपूं नये. जमिनीवर एक चटई अंथरून झोपावें.

(९) भिक्षूंनी नाच, गाणें, तमाशे पाहूं नयेत व सांसारिक सुखद दृश्यें पाहून रममाण होऊं नये.

(१०) सोनें, चांदी भिक्षूंनी जवळ ठेऊं नये व कुणी दिल्यास त्याचा स्वीकार करूं नये.

अशा प्रकारें बुद्धाने सर्व मानव समाजाच्या जोपासनेकरिता व नैतिक संवर्धनाकरिता वरील धर्मोपदेश केला. बुद्धावस्था किंवा निर्वाणप्राप्तीकरिता धडपड करणाऱ्या भिक्षुकांकरिता बुद्धाने अत्यंत कडक नियमांचें पालन करावयास सांगितलें. "सर्व पापांपासून विरत होणें, (सर्व) कुशलाचा (पुण्याचा) संचय करणें आणि स्वचित्ताचें संशोधन करणें हें बुद्धाचें अनुशासन होय." (धम्मपद)

बुद्धाजवळ जातिभेद, पंक्तिभेद किंवा वर्णभेद मुळीच नाही. ज्याच्याजवळ पवित्र हृदय आहे तो बुद्धाचा शिष्य होऊं शकतो. बुद्धाने स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांचा स्वीकार केला आहे.

(१) सर्वांवर सारखें प्रेम करणें;

(२) दुःखितांवर दया करणें, व त्यांची सेवा करणें;

(३) सर्वांच्या सुखांत आपण सुख मानणें.

हीं तीन मूल्यवान तत्त्वें देखील बुद्धाने सर्व जगाला सांगितलीं आहेत. त्यावरून बुद्धाला परमेश्वराच्या प्रार्थना व पूजेपेक्षा मानवतेच्या हिताची व उद्धाराची किती कळकळ होती हें स्पष्ट दिसून येतें.

बुद्ध-दर्शन (Metaphysics)

भगवान् बुद्धाने सांख्यासारखें किंवा वेदान्तासारखें शास्त्रीय, तर्कशुद्ध (logical), असें दर्शन निर्माण केलें नाही. त्यामुळे 'बुद्ध-दर्शन' हें दर्शनच नाही असें सर हरिसिंग गौर यांनी आपल्या पुस्तकांत जें विधान केलें आहे तें बऱ्याच अंशीं सत्य आहे. तरी त्यांनी ईश्वर, आत्मा व हें सर्व जग यांसंबंधी जो अधूनमधून उल्लेख केलेला आढळतो, त्यावरून त्यांचीं ईश्वर, आत्मा, ब्रह्म वगैरेसंबंधी मतें अंधुक रूपाने कळतात.

आत्मा

आत्म्यासंबंधी उपनिषदांची, सांख्यांची व भगवत्-गीतेची जी समजूत आहे ती बौद्धांना मुळीच मान्य नाही. वेदान्तांच्या मताप्रमाणे आत्मा ब्रह्मदेवाचा एक अंश आहे, तो निर्गुण, अविनाशी, अनादि व अमर आहे. मन, बुद्धि, चित्त, अहंकार या सूक्ष्म देहापेक्षाहि आत्मा वेगळा आहे; तो सर्व विश्वाचें कारण आहे व प्रकृति त्याला आपला अध्यक्ष समजून आपला पसारा करते हें वेदान्तांचें किंवा भगवत्गीतेचें मत बौद्धांना मान्य नाही. आत्मा अमर आहे हें मत प्लेटो, ज्यू व ख्रिस्ताला*

* Dr. Bhandarkar–A peep into the early history of India, p. 46.

† धम्मपद, १८ वें प्रकरण–२४६, २४७

* Genesis, II–7 (old Testament of the Bible)
Mathew XXVII 50 John XIX–30 (New Testament of the Bible)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देखील मान्य आहे. पण बुद्धाला आत्म्यासंबंधी वरील मत बिलकूल मान्य नाही. यावरून बुद्ध भौतिक-वादी होते हें सिद्ध होत नाही. त्यांनी भौतिक पदार्थ देखील अशाश्वत आहे असें म्हटलें आहे.

बुद्धाने आत्म्याचें अस्तित्व जरी साफ नाकारलें असलें तरी पुनर्जन्म, व्यक्तीचें सातत्य किंवा चित्त, अहंकार यांचें सातत्य (continuity) मान्य केलेलें आहे. इथेच बुद्धाचा बुद्धिवाद संपून धर्म सुरू होतो. जेव्हा बुद्धाला गया येथे वडाच्या झाडाखाली–ज्ञानवृक्षाखाली सातव्या दिवशीं ज्ञानप्राप्ति झाली तेव्हा त्यांना दुःखाचें मूळ कारण समजलें. त्या दुःखाची कारणकार्य-परंपरा त्यांनी खालीलप्रमाणे दिली आहे.

(१) अज्ञान अविद्या हें सर्व दुःखाचें मूळ कारण. या अज्ञानामुळे संस्कार निर्माण होतात.

(२) संस्कारामुळे चेतना.

(३) चेतनेमुळे नांव.

(४) नांवामुळे रूप.

(५) नांव व रूपामुळें सहा इंद्रियें.

(६) सहा इंद्रियांमुळे सहवास.

(७) सहवासामुळे स्पर्श.

(८) स्पर्शामुळे तृष्णा.

(९) तृष्णेमुळे आसक्ति

(१०) आसक्तीमुळे अस्तित्व (existence)

(११) अस्तित्वामुळे जन्म

(१२) जन्मामुळे म्हातारपण, मृत्यु, काळजी, दुःख इत्यादि.

अशाप्रकारें मानवी दुःखाची कारण-कार्य-परंपरा आहे. यांच्या उलट मार्गाने अर्थात् अज्ञानाने संस्कार, संस्काराने चेतना नष्ट करीत करीत गेल्याने मानवी दुःखाची संपूर्ण हानि करतां येते असा भगवान बुद्धाने दुःखनिरसनाचा मार्ग सांगितला आहे. हें दुःखनिरसन निर्वाणप्राप्तीशिवाय होऊं शकणार नाही व निर्वाणप्राप्ति सर्वोच्च समाधींत (Concentration) देहावसान झाल्याशिवाय होऊं शकणार नाही हें बुद्धाने स्पष्ट शब्दांत आपल्या शिष्यांना सांगितलें.

बुद्धाने ईश्वर व आत्म्याचें अस्तित्व एकदम अमान्य केलें पण ईश्वरासंबंधी निश्चित असें मत आपल्या शिष्यांना केव्हाच दिलें नाही. 'ईश्वर' या शब्दाचे निर-निराळे लोक व धर्म निरनिराळे अर्थ काढतात. खुद्द पर-मेश्वराने सांगितलेले धर्म (Revealed religions) उदा० इस्लाम, ख्रिस्ति-धर्म ईश्वर ही कोणी व्यक्ति असून ती स्वर्गांतून सर्व जगाचीं सूत्रें हलविते व हीच सर्व जगाचें रक्षण, पालन, उभारणी व संहार करते असें प्रतिपादन करतात. ही विचारसरणी बुद्धाला मुळीच मान्य नाही. त्याचप्रमाणे वेदांन्तांची सर्व जगालाच ब्रह्म समजण्याची विचारसरणीहि बुद्धाला त्याज्य वाटते. या जगाशिवाय ईश्वराचें ज्ञान मानवी बुद्धीला होऊं शकत नाही; म्हणून बुद्ध हे अज्ञेयवादी होते इतकें म्हणतां येईल. पण यावरून ते नास्तिक होते हें सिद्ध करतां येत नाही. त्याचप्रमाणे सर हरिसिंग गौर* यांच्या मताप्रमाणें "बुद्धाचा ईश्वरावर पूर्ण विश्वास होता" हें अनुमान देखील तर्कशुद्ध आहे असें सिद्ध करतां येत नाही.

निर्वाण

"दुःखान्ती आत्यंतिक हानि म्हणजे निर्वाण†" अशी बुद्धाने निर्वाण शब्दाची सुटसुटीत व्याख्या केली आहे. निर्वाण ही कल्पना नास्तिवाची आहे. सर्व दुर्गुणांचा—काम, क्रोध, माया, मोह, लोभ, मत्सर—क्षय करणें म्हणजे निर्वाणप्राप्ति करणें होय. ज्या माणसाने सद्गुणांचा संचय केला आहे व ज्यानें स्वःतच्या मनावर ताबा मिळविला आहे तो जिवंत-पणीच निर्वाणाचा अनुभव करतो असें बुद्ध म्हणतात. वेदान्तांच्या मोक्षाच्या कल्पनेप्रमाणे आत्मा परब्रह्मांत विलीन होतो तर सांख्यांच्या मताप्रमाणे प्रकृति पुरुषा-समोर नृत्य करणें बंद करते. बुद्धाच्या निर्वाणांत मनाला चैतन्य व अचैतन्य यांची जाणीव नसते. तें शून्यांत तादात्म्य पावतें.

---

* The spirit of Buddhism, p. 284.

† Dr. Oldenberg–Buddhism' p. 271; Saint Hilaire--Buddhism, p. 175

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बर्फाचा तुकडा

अनुवादक—द. चिं. सोमण

स्पेनमधील कॅसटाइल विभागांत शेतांतील धान्याची कापणी सुरू होती. आखूड देठांचीं लहान लहान हलकीं कणसें वाऱ्यावर माना पुढे करीत डोलत होतीं. हंगामाला लवकर येणारीं सर्वच कणसें अशीं असतात. कांही ठिकाणीं तोडलेल्या कणसांचे ढीग जमिनीवर पडलेले आढळत. कांही शेतांतील तोडलेलीं कणसें दूर नेण्यांत आलेलीं होतीं व कांही वेळां तीं कणसें घेऊन जाणारे भरगच्च भरलेले खटारे कण्हत कण्हत चाकोरींतून हुंवकळत मार्ग कंठीत असलेले नजरेस पडत.

त्या विभागांतल्या त्या अनेक शेतांच्या मर्यादा परक्या माणसाला कळायच्यासुद्धा नाहीत; जन्मापासून त्या पिंगट करड्या भूमीवर वावरलेल्यांचे सरावलेले डोळेच त्या शेतांचे आकार ओळखूं शकले असते. अशा त्या विस्तीर्ण धुळकट गवतड प्रदेशांतून सड् एक्सप्रेस, उजाडल्यापासून रांगत, विसावा घेत, प्रत्येक स्टेशनावर मुक्काम करीत, धापा टाकीत पुढे पुढे सरकत होती. आगगाडींतले प्रवासी बाहेर बघून बघून कंटाळले होते आणि डब्यांतल्या डागळलेल्या गाद्यांवर बसून घाम पुसण्याचें काम करण्याखेरीज त्यांना दुसरें कांही सुचतच नव्हतें, कारण कॅसटाइल भागांतला निसर्ग उन्हाळ्यांत तर दृष्टिसमोर नको असा असतो. सगळीकडे रखरख व उजाडपणा! इतर अनेक देशांतील वनश्री त्या विभागांत नव्हती. प्रवाश्यांची दृष्टि सुखविणारीं पाईन जंगलें, धबधबे, हिरव्यागार वेली, लहान मोठ्या गवताळ टेकड्या यांचा मागमूसहि त्या ठिकाणीं नव्हता. अगदी दूरपर्यंत पसरलेला सपाट प्रदेश व त्याच्या सीमा आंखणाऱ्या रेखीव टेकड्यांचे लांब अंतरावर दिसणारे कडे! त्या टेकड्या देखील अगदी साध्या! सूर्योदय व सूर्यास्त होत असतांना त्या उंचवटयांवर व त्यांच्यामागे रंगीबेरंगी उजेड खेळे तेवढाच त्यांचा शोभेशीं संबंध!

चौफेर पसरलेल्या करड्या मैदानांतील झाडांचीं लहानमोठीं खोडें भयंकर उन्हाने पोळून काढलीं होतीं व त्यांच्या साली सुटल्यासारख्या झाल्या होत्या. वर्षाच्या वादळांत झाडें कण्हत यातना भोगतात, उन्हाळ्यानेहि त्याच यातना त्यांना पुन्हा एकवार भोगायला लावलेल्या होत्या! तरीहि कांही काटेरी पिवळीं थिसल जातीचीं फुलें त्या भयानक उन्हालाहि न जुमानतां माना उंचावून निर्भयपणें इकडे तिकडे बघत होतींच! शेतांतून व मैदानांतून गाढवांवर बसलेले अनेक लोक लहानमोठ्या रांगा करून जातयेत होते. त्या सगळ्या शेतकऱ्यांची त्वचा उन्हाने काळवंडून गेल्याने ते अरब लोकांसारखें दिसत व अरब जमातीशीं असलेलें त्यांचें साम्य अधिक पटवून देण्यासाठीच कीं काय ते मधून मधून हेल काढून बसकट आवाजांत शोकपूर्ण गाणीं म्हणत आणि त्या भयंकर उन्हांतहि संथपणें वावरत!

तो सर्व कॅसटाईल विभाग एका अरुंद रेल्वेमार्गानें बाहेरच्या, त्या भागाहून अगदीच वेगळ्या असलेल्या जगाशीं जोडलेला होता. बाहेरचें जग! वर्तमानपत्रें, रेडिओ, मोटारी, विमानें, टेलिफोन यांचें जग!

अरुंद पोलादी पट्टीप्रमाणे उन्हांत चकाकत रेल्वेचे रूळ दूरवर गेलेले दिसत. कित्येक लहान लहान खेड्यांतून ते रूळ जात. दहावीस छोटीं कौलारू घरें, मध्यभागीं जुनें असल्यामुळे करडें पडलेलें चर्च, सभोवार शेतें! संपलें खेडें! एखादा पायवाटवजा रस्ता खेड्यांतून दूर जाऊन एखाद्या शेतांत अचानक गडप होई! तीं सगळीं खेडीं एखाद्या साध्या रस्त्याने जोडलेलीं असायचीं. तो रस्ता कधी रेल्वेमार्गाला समांतर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असा जाई आणि मध्येच पाईन झाडांची एखादी आटो-पशीर झाडी ओलांडी. वारंवार मोठमोठीं वळणें घेत खडकाळ टेकड्यांना बगल देत रस्ता पुन्हा रुळांजवळ यायचा. कित्येक वेळां बरेंच अंतर नाल्याच्या काठा-काठाने जाऊन उथळपाण्याच्या जागीं रस्ता स्वस्थपणें नाला ओलांडून टाकी. दूरचीं गावें पालथ्या टाकलेल्या मचव्यांसारखीं दिसत व मध्यभागीं असलेला प्रार्थना-मंदिराचा मनोरा हवेंत अंधांतरींच असल्याचा भास होई! अशीं अनेक गावें जवळ ओढीत आणि कांही मुद्दाम दूरच ठेवीत आगगाडी खणखण करीत गडगडत पुढे चालायची! सर्वच स्टेशनांचीं नांवें भरपूर लांब-लचक व त्या स्टेशनांपैकी कांही तर इतकीं लहान की अगदी प्रथम रूळ टाकले गेले तेव्हापासून एकहि प्रवासी तिथून गाडींत चढला नसावा असें वाटे. अशा एखाद्या स्टेशनांत आगगाडी शिरली की फलाटावरच अस-लेल्या एखाद्या मोठ्या वृक्षाच्या गर्द छायेंत स्वतःचा अर्धा देह ठेवीत ती थांबे. स्टेशनाच्या खोल्यांतून कुणी-तरी सावकाशपणें बाहेर येई व ओरडून स्टेशनाचें नांव सांगत, 'एक मिनिट!' 'दोन मिनिटें' असा गाडीच्या मुक्कामाचा काळ जाहीर करी. गाडीचा मुक्काम 'एकच मिनिट' जाहीर केला गेला तरी गाडी खुशाल दहा मिनिटेंसुद्धा तिथेंच रेंगाळायची. स्टेशनावर कधी कधी एखादें तट्टू बांधलेलें आढळे. डोळ्यांची उघडझाप करीत, पाठीवरच्या जुनाट, जड खोगीराला हिसडे देत, तें तट्टू उभें असायचें आणि त्याच्या पाठीवरहि माल-काने टाकलेली करड्या ब्लँकेटाची चौकोनी घडी खाली धूळ खात पडलेली आढळायची. कोळशांनी लादलेलीं गाढवें केव्हा केव्हा गाडीच्या अगदी जवळ येऊन थांबत. त्यांचें ओझें मालाच्या डब्यांत ओतून घेण्यांत येई. जवळच कुठेतरी उष्णतेने वैतागलेलीं कबूतरें फडफड करीत स्टेशनाच्या आसपास असलेल्या घरांपैकी एखा-द्यांतून अपुरा वेष केलेली, घोड्याच्या आयाळीप्रमाणे केस विसकटलेली एखादी स्त्री खिडकीचा पडदा दातांत धरून आगगाडीकडे उगीचच बघत उभी राही! अशीं होतीं तीं सारीं स्टेशनें. त्या करड्या समुद्रांतील बेटेंच जणू! उन्हाने करपलेलीं व रंगसादृश्यामुळे भोवताल-च्या निसर्गाचाच भाग वाटणारीं! गांवांतील घरेंहि जमिनीचाच निसर्गनिर्मित भाग!

अशा त्या खेड्यापाड्यांना ते अरुंद रूळ जोडीत आणि सड् एक्सप्रेस त्या गरम रुळांवरून रांगे! त्या दिवशीं बाहेर व गाडींतहि उन्हाची धग वाटत होती. गरम झालेल्या हवेमुळे जीव कासावीस होत होता व दूरच्या टेकड्या पारदर्शक असल्याचा भास निर्माण करणारी तापलेली हवा थरकापत होती.

जवळ जवळ पूर्णपणें कोरड्या पडलेल्या एखाद्या नाल्याशीं काळ्या गुरांचा कळप उभा असलेला प्रवा-श्यांच्या दृष्टीस पडे. त्यांतला एखादा बैल ओलसर माती हुंगायचा. भाजल्या गेलेल्या चिखलाचे गोळे चकाकत. चिनी मातीच्या फुटलेल्या भांड्याचे तुकडे चकाकावेत तसे! तो बैल पाय आपटायचा, ओरडायचा व पुन्हा कळपांत सामील व्हायचा. काळे पडलेले गुराखी खांबांप्रमाणे निश्चल उभे होते—आणि त्यांच्या सावलींत त्यांचीं कुत्रीं विसावा घेत होतीं. गुरांचे कळप माना खाली करून कडें जमवून उभे होते. सगळे जडजड त्या भयाण उष्णतेंत निश्चल होतें!

अशा त्या प्रदेशांतून हायहुय करीत सड् एक्सप्रेस ऐन दुपारीं एका स्टेशनांत शिरली. पोर्टर हेट काढून 'सॅन्‌चिड्रिअन' 'सॅन्‌चिड्रिअन' 'पांच मिनिटें!' असें ओरडायला लागला. गाडीचें एंजिन धडधडत होतें; त्याला विश्रांति हवीच होती! स्टेशनच्या जरा बाहेर-च्या बाजूला एक मालगाडी उभी होती. ठळक अक्षरांत तिच्या डब्यांवर खडूने लिहीलेलीं कांही वाक्यें फलाटा-वरूनहि वाचतां येण्याजोगीं होतीं. कुणीच नव्हतें स्टेशनावर! स्पेनमधल्या सगळ्या लहान लहान स्टेशनांवर आढळणारे खेडवळांचे जमाव अथवा उगाचच केवळ वेळ काढायचा म्हणून इकडे तिकडे हिंडणारे गबाळ पोशाख केलेले पुरुष स्टेशनांत नव्हते, कारण सॅन्‌चिड्रिअन स्टेशन गावापासून फार दूर अंतरावर होतें!

सॅन्‌चिड्रिअनचा स्टेशन मास्तर बटनांचा कोट घालून सोनेरी पट्टी लावलेली टोपी मधून मधून चाचपीत, कंटाळलेली मुद्रा करून पोर्टरजवळच उभा होता. स्टेशनजवळ असलेल्या विहीरीशीं एक कृश पिवळा पडलेला कुत्रा आणि दोन नागडींउघडीं मुलें होतीं. गाडी पांच मिनीटें तिथे थांबायची पण एकच मिनिट जरी तिने तिथे मुक्काम केला असतां तरी चाललें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतें किंवा तब्बल अर्धा तास जरी ती तिथेंच रेंगाळली असती तरीहि कुणी तक्रार केली नसती. परंतु एका व्यक्तीला मात्र गाडीची काळजी पडलेली दिसली! धुळीच्या लोटांतून एक घोडेस्वार हातांत एक पोतें घेऊन घाईघाईने स्टेशनांत शिरला व तडक आगगाडीच्या एका डब्याजवळ गेला. गाडींतील लोकांच्या जेवणाची व्यवस्था ठेवणाऱ्या लोकांचा डबा होता तो! डब्याच्या दारांतच स्वयंपाकी व वाढपी लोक मोकळा श्वास घेण्याकरिता उभे होते.

"मित्रहो!"—हॅट काढीत व आपला करडा तळहात कपाळावरून फिरवीत तो म्हणाला, "थोडं बर्फ आहे कां? आहे?"

सर्वजण त्याच्याकडे बघूं लागले. काळ्या कापडाचें जाकीट, त्याच कापडाची घट्ट तुमान व कमरेला गुंडाळलेलें काळें फडकें असा वेष होता त्याचा. त्याच्या खांद्यावरील जुन्या विटलेल्या लाल रंगाच्या पोत्याकडे त्यांनी दृष्टि टाकली.

"बर्फ? आहे ना!"—त्यांच्यापैकी एकजण म्हणाला. "असल्या विलक्षण उन्हांत बर्फाशिवाय एक प्रवासी जगायचा नाही!" बाहेरच्या जगांतील कुणाशीं तरी बोलायची आपली इच्छा त्या बोलणाऱ्या इसमाने थोडीफार भागवून घेतली.

त्या पोतेंवाल्या जवानाने डोळ्यांच्या कोपऱ्यांतून अर्धवट् झोपेंत असलेल्या गाडीकडे पाहिलें, जणू कांही ती एक्सप्रेस म्हणजे एक नाठाळ घोडीच होती! चटकन् त्याला टाप हाणून ती पळूनच गेली असती अशी त्याला भीति वाटली असावी!

"या गाडींत तुम्हाला बर्फाशिवाय जगतां येत नाही म्हणतां तुम्ही? अं?"–तो म्हणाला, "तरी तुम्ही सारे अगदी धडधाकट आहांत! माझ्या आजारी बापाचा जीव तिकडे बर्फासाठी घुटमळतो आहे! कित्येक दिवस तापाने त्याचा पाठपुरावा केला आहे; खाऊन टाकलं आहे त्याला! गावांत रोज रात्रीं पहारेकरी किती वाजले हें ओरडून सांगायला लागला की तो म्हणतो, 'माय्ग्युएल! थोडं बर्फ मिळेल तर मी सुखाने प्राण सोडीन बघ! थोडं गार गार बर्फ कपाळावर आणि थोडं ओठांवर ठेवशील तर मरण सुखाचं होईल मला!' माय्ग्युएल हें माझं नांव; माय्ग्युएल मार्टिनेझ! सन्‌चिड्रिअन गावांत बर्फ कुठून मिळायला? माझ्या बापाच्या आयुष्यांतला अखेरचा दिवस आज उजाडला आहे! धर्मगुरु आज मला म्हणाला, 'माय्ग्युएल! जेरी झॅनोवर खोगीर चढव आणि धाव मार! आगगाडी गाठ! तियं सांपडेल बर्फ! प्रवासी बर्फाशिवाय जगणं शक्य नाही! तिथं हटकून सापडेल बघ बर्फ!'—आणि म्हणून मी आलों! कृपा करून बर्फाचा एक तुकडा द्याल कां?"

"प्रवासी लोकांनी लवकर गाडींत चढावें!"—पोर्टर ओरडला. कांही वेळाने ड्रायव्हर सावकाश एंजिनवर चढला. अखेर गार्डाने शिट्टी वाजवली; डब्यांना जोडणाऱ्या सांखळ्या ताणल्या गेल्या. तेवढ्यांत डब्यांतला स्वयंपाकी बर्फाचा पावाएवढा मोठा तुकडा गवतांत गुंडाळीत दाराशीं आला. त्याने तें बर्फ उन्हांत तिष्ठत असलेल्या माय्ग्युएलला दिलें.

"अत्यंत आभारी आहे मी! बापाच्या वतीने मुलगा त्याचें ऋण मान्य करीत आहे! काय किंमत या अमूल्य बर्फाची?"

गाडी तेवढ्यांत हळूहळू चालायला लागली. स्वयंपाकी, वाढपी व इतर नोकर यांनी एकमेकांकडे पाहिलें. त्यांच्यातला एकजण म्हणाला, "दोस्त! हा बर्फ विक्रीकरता नाही! तो विकायची परवानगी नाही आम्हाला!"

माय्ग्युएल गाडीबरोबर भरभर चालायला लागला. "पुन्हा एकदा शेकडो, हजारो, लाखो आभार! फार फार उपकार केलेत माझ्यावर! पैसे तर तुम्ही घेत नाही पण ही चिरूटांची पेटी माझी आठवण म्हणून घ्या! घ्या! नाही म्हणूं नका!"—डब्याच्या दाराशीं असलेल्या एकाच्या हातीं त्याने ती कागदी पेटी बळें बळें दिली. स्पेनमधल्या लहान लहान दुकानांत विकत मिळणाऱ्या मामुली दर्जाच्या चिरूटांची छोटी पेटी होती ती!

किंचित् वळण घेऊन गाडी त्याला मागे टाकून निघून गेली. क्षणभर उन्हांतच उभें राहून हात उंच करून, शुभ्र कपडे घातलेल्या गाडींतील त्या नोकरांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याने निरोप घेतला व मग धांवल्यासारखें करीत तो घोड्याजवळ आला. त्याने बांधलेला घोडा मोकळा केला व खोगीर नीट बसवून एकदम उडी मारून तो घोड्यावर बसला. खोगीराला खोचून ठेवलेली ऑलिव्ह झाडाची फांदी त्याने हातांत घेतली, घोडा हाकलण्याकरिता! उजव्या हाताने पुन्हा बर्फाचा तुकडा चांचपीत त्याने घोड्याला टांच मारली आणि तो निघाला. अरुंद रस्त्यावर शुभ्र धुळीचा जाड थर बर्फासारखा साचला होता; टापांचा आवाज त्यामुळे वोथट होई! त्यामुळेच घोडा हवकळत चालला आहे असें वाटे! माय्ग्युएल लगाम हलवून घोड्याला पळवायचा प्रयत्न करीत होता. रुंद कडा असलेल्या उदी फेल्ट हॅटखालचा चेहरा अधीरतेने व्याप्त होता! घोड्याच्या अंगांतून पुन्हा घाम निथळायला लागला तेव्हा माय्ग्युएलने पायाने घोड्याची कूस दावून त्याची गति मंद केली. मधून मधून मागे वळून पोत्यांतला तुकडा तो हाताने चाचपी! त्या भयानक उष्णतेंत तुकड्याचा कितपत निभाव लागेल याचा अंदाज त्याला लागत नव्हता.!

पोत्यांतून सतत पाणी ठिपकायला लागल्यामुळें त्यानें एकदम घोडा दामटवायला सुरवात केली. गवताचे भारे अथवा कोळशांचीं पोतीं यांनी लादलेलीं गाढवें आणि गाढवांवर वसलेले कांही लोक यांना मागे टाकीत माय्ग्युएल घाईने पुढे जात होता. कांही त्याच्याकडे जिज्ञासापूर्ण, नजरेने बघत व कांही त्याला निरोप देत मोठ्याने ओरडून धांवपळीचें कारण विचारीत! तथापि तो मात्र कांहीच न बोलतां नुसता हात हलवून त्यांचा निरोप घेत घोड्याला वारंवार टांच मारी! मध्येच ऑलिव्ह झाडांच्या एकाकी राईंतून त्याला जावें लागे. झाडांच्या छायेंत कांहीजण दुपारचें जेवण आटपीत वसलेले असत. त्यांच्या पसरट हॅटस् जवळच पडलेल्या असत आणि त्यांच्या डोक्यांना गुंडाळलेल्या निळ्या ठिपक्यांच्या रुमालाची जुन्या पद्धतीप्रमाणे मानेवर गांठ मारलेली असे. धुळीच्या ढगांतून माय्ग्युएल जात असतांना ते लोक जवळच्या अन्नाकडे, दारूच्या कातडी पिशव्यांकडे व ऑलिव्ह फळांकडे वोट दाखवून त्याला जेवायला वोलावीत व तो खुणेनेच त्यांचें प्रेमळ आमंत्रण साभार नाकारी!

घोडा आता खडकाळ चढावाच्या मार्गाला लागल्याने माय्ग्युएलला किंचित् आवरून बसल्यासारखें करावें लागत होतें. त्याचा रस्ता आता झुडपांच्या प्रदेशांतून जात होता. त्याने पायांत अडकवलेल्या रिकीबी वाटेच्या अरुंदपणामुळे दोन्ही बाजूच्या झुडपांना घासल्या जात व झुडपांचा चीक रिकीबींना चिकटून इतरहि घाण त्यावर लगेच बसे! स्पेनमधील लोक पक्षी धरण्याकरिता झाडाच्या फांद्यांना चिकटा लावून ठेवतात त्याची आठवण माय्ग्युएलच्या रिकीबींकडे पाहून झाली असती!

टपोर पांढऱ्या रानटी फुलांभोवती फुलपाखरें घुटमळत होतीं. मोठे सरडे चटकन् झाडांच्या खोडांवर चढत व एकदम नाहीसे होत. भोवतालच्या प्रदेशाच्या अगदी आंतल्या भागांतून रानकिड्यांचा बारीक एकेरी आवाज सतत येत होता. टोळांचा एखादा थवा उडत उडत रस्ता ओलांडी आणि एखाद्या झुडपांत घुसे! उडणाऱ्या माशांचा पुंजका झेप घेऊन लाटेंत घुसतो त्याची आठवण व्हावी!

वाटेवरील वाळूंतून व बाजूच्या झुडपांतून कराव्या लागणाऱ्या त्या अर्ध्या तासाच्या प्रवासाने घोड्याच्या नाकीं दम आणला होता. श्रमामुळे त्याच्या कुशी खालीवर होत होत्या, नाकपुड्या फुगल्या होत्या व डोळे बाहेर पडल्यागत झाले होते. माय्ग्युएल पुन्हा सपाट रस्त्याला लागला. थोड्याच वेळांत लहान करडीं छपरें असलेलें तें खेडें दिसूं लागलें. तो घोड्यावरून उतरला. पोत्यांतून पाण्याचे टपोरे थेंब जमिनीवर उड्या घेत होते. त्याने पोतें नीट ठेवल्यासारखे केलें, खोगीर किंचित् आवळला आणि कमरेचें काळे फडकें घट्ट करून तो पुन्हा घोड्यावर चढला.

धान्याचें एक खळें ओलांडून घोडा पुढे निघाला. खळ्यांवर कांही खेचरें धान्य तुडवीत होतीं. सगळें खळें पांढरें शुभ्र होऊन चकचकत होतें; संगमरवरी दगडाचा कठीणपणा त्यांत आल्याचा भास होई! उन्हाने करपलेले कांही लोक जवळच लाकडीं पावड्यांनी धान्य हवेंत फेकून त्यांतील भूस वेगळें करीत होते. माय्ग्युएल त्यांच्याजवळून गेला तेव्हा त्यांनी त्याच्या वागण्याच्या प्रकृतीची चौकशी ओरडून केली तथापि त्या सर्वांना हात हलवून खुणेनेच उत्तर देत तो घोड्याला टांच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मारी. माय्ग्युएलच्या रिकिबीजवळची घोड्याची त्वचा रक्तबंबाळ झाली होती.

तो रस्ता गावाच्या अर्ध्या भागाच्या बाहेर पडून कोरड्या पडलेल्या एका नाल्यांतून जात, गारगोट्या टाकलेल्या एका अरुंद रस्त्याला मिळाला. गारगोट्यांमुळे घोडा अडखळत जाऊं लागला. कांही झोपड्या मागे पडल्या. प्रत्येक झोपडीसमोर बकऱ्या व बोकड यांचे थवे होते. पुन्हा थोडें अंतर कापून माय्ग्युएल दुसऱ्या एका लहान रस्त्यावर आला. त्यावरील चर्च पुढून जातांना त्याने टोपीला हात लावून क्रूसचिन्ह केलें, व जरा वळून तो आणखी एका रस्त्याला लागला. त्या रस्त्यावरचीं घरें बऱ्यांपैकी दिसत होतीं. घोडा आता अगदी सावकाश कष्टाने चालत होता. माय्ग्युएल एका घराजवळ आला. आणि त्या घरांत उडालेला शोककल्लोळ त्याच्या कानांवर आदळला. तो घोड्यावरून उतरला. त्याच्या हातांतून लगाम गळून पडला. धर्मगुरु घाईने पुढे येऊन हळू आवाजांत म्हणाला, "माय्ग्युएल! तासापूर्वीच तुझा बाप ख्रिस्तवासी झाला. अंगांत भयंकर ताप असूनहि प्रभुकृपेने त्याचें मरण सुखाचें झालें. कारण मृत्युपूर्वी तासभर तो बेशुद्ध असतांना सारखा म्हणत होता," किती गार आहे हें बर्फ ! माझ्या डोक्यांतले घणाचे घाव कमी झाले त्यामुळे ! माझी तहानहि भागली ! माझ्या माय्ग्युएलने मुद्दाम स्टेशनवर जाऊन बर्फ आणलें म्हणून कमी झाल्या माझ्या यातना ! "

माय्ग्युएल घोड्याकडे वळला व पोत्यांतून तो बर्फाचा तुकडा त्याने काढला. आता फक्त सफरचंदाएवढाच उरला होता तो ! हातांत बर्फ घेऊन धर्मगुरूच्या मागोमाग तो घरांत गेला. त्याच्या बापाचें शव बिछान्यावर पडलेलें होतें. प्रेताभोवती कांही बायका कोंडाळें करून स्फुंदत होत्या. खोलीच्या एका कोपऱ्यांत मुलें एकमेकांचे हात घट्ट पकडून चकित दृष्टीने कलेवराकडे पहात होतीं. वालनट झाडाचा ओंडका चादरीवर ठेवल्याप्रमाणे त्यांना तें शव वाटत होतें !

माय्ग्युएल गुढगे टेकून प्रेताजवळ बसला. बापाच्या कृश फिक्या पडलेल्या हाताचें त्याने चुंबन घेतलें व स्वतःच्या हृदयावर क्रूसचिन्ह केलें. नंतर डोळे मिटून थोडी प्रार्थना केल्यावर तो उठला आणि तो अमोल बर्फाचा तुकडा त्याने प्रथम प्रेताच्या कपाळावर व मग तोच तुकडा अति हळुवारपणें त्याच्या ओठावर टेकला. बायकांशीं सांत्वनपर कांही बोलून माय्ग्युएल लगेच बाहेर पडून घोड्याजवळ आला. घोड्याचे वाकलेले पाय लटपट कापत होते व त्याची मान खाली गेली होती. त्याच्या देहांतून निथळणाऱ्या घामाने जमिनीवर मोठा डाग उमटला होता. खोगीर उतरवून माय्ग्युएल घोड्याला घेऊन तबेल्यांत गेला. व त्याच्यापुढे गवताच्या चार पेंढ्या टाकून तो पुन्हा घरांत आला.

धर्मगुरु प्रार्थना करीत होता आणि बायका ओक्याबोक्शी रडत होत्या. समुद्राच्या लाटा फेसाळत वाळूवर घोळल्या जातात तेव्हा जसा आवाज येतो तसा त्यांच्या शोकाचा आवाज उमटत, रेंगाळत होता !

अगदी दूर उत्तरेकडे ती सड् एक्स्प्रेस चकाकणाऱ्या अरुंद रुळांवरून स्पेनच्या राजधानीकडे माद्रिदकडे हुंदकळत, खणखणत जात होती;

आणि जणू म्हणत होती—

बर्फ—बर्फ—बर्फ !

[Robert Bontine Cunningham Graham च्या 'At Sanchidrian' या कथेचा अनुवाद.]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन पत्रें

: १ :

['मंडला' येथील 'वनवासी सेवा मंडल' या संस्थेचे कार्यमंत्री व निष्ठावंत कार्यकर्ते श्री. नानासाहेब बापट यांनी, आपण आदिवासींच्या कार्याकडे कसे आकर्षिले गेलों याचें वर्णन सुरस रीतीनें पुढील पत्रांत केलें आहे. 'जुन्या आठवणीची, ही गाथा आहे.' 'युगवाणी'च्या वाचकांना हें पत्र आवडेल अशी आम्हाला आशा आहे.—संपादक युगवाणी.]

वनवासी धाम, मंडला

संपादक, 'युगवाणी' यांस (म. प्र.)

सा. न. वि. वि.

कामाची धांदल व लिहिण्याचा आळस यांमुळे आपल्यास दिलेलें—नव्हे आपण युक्तीनें माझ्या तोंडून वदविलेलें वचन मी अजून पाळलें नाही, ही गोष्ट मला सतत जाचत आहे. आज पहिलें छोटेखानी पत्र लिहून माझें उत्तरदायित्व कमी करण्याचा माझा प्रयत्न आहे.

मला पुष्कळ मित्र विचारतात, 'तुम्ही या आदिवासी कार्यांत कधी व कसे शिरलां ? एम्. ए., बी. टी. होऊन जवलपुरांतील एका मोठया हायस्कुलाचें ९ वर्षें संचालन तुमचेकडे असतांना 'वनवन' करण्याची पाळी तुमचेवर कां आली ? अगदी प्रथम हा विचार तुमचे मनांत केव्हा डोकावला ?' या प्रश्नावलीचें थोडक्यांत उत्तर या पत्रांत देण्याचा मी प्रयत्न करीत आहें.

१९४५ च्या 'मे' महिन्यांतील अमावास्येचा दिवस ! मी त्या दिवशीं सायंकाळीं 'पिपरीया'हून 'छिंदवाडया'कडे जाणाऱ्या वसनें 'देलाखारी' नांवाच्या वनग्रामीं जाऊन पोचलों. मला तेथून १९ मैल असलेल्या 'वह्यनी' नांवाच्या गोंड जमीनदारीच्या गावीं धाकटया भावास भेटण्यासाठी जावयाचें होतें. तेथे उघडलेल्या प्रायोगिक दवाखान्यांत भाऊ डॉक्टर होता. पत्र पोचण्यास १५–२० दिवस लागत. त्याचें लग्न ठरलें; मुहूर्त दहा दिवसांवर आलेला. प्रत्यक्ष भेटून, त्यास बरोबर घेऊन जाण्याशिवाय मार्ग नव्हता. आई त्याचे जवळ जाऊन राहिली होती. एकएक दिवस मोलाचा होता.

अमावास्येला रात्रीं बरोबर प्रवास करण्यास सामानानें भरलेली बैलगाडी मिळाली. गडद अंधारांत मी ठेचा खात, गाडीच्या खडखडण्याच्या आवाजांत, मार्ग क्रमीत होतों. रस्त्यावर पडलेल्या पाचोळयांत गाडीवान वाट विसरला. पाचोळा, जागजागीं पेटवून आम्ही मार्ग धुंडला व पहाटे चारचे सुमारास कुत्र्यांचें भुंकणें ऐकून, जवळ गाव आहे असें ठरविलें व विश्रांतीसाठी थांबलों. मला पाळत ठेवण्यास सांगून गाडीवान झोपीं गेला. पहाटे दिसूं लागतांच, मी गाडीवाल्याची वाट न पाहतां पुढे चालूं लागलों.

चोहोकडे डोंगर आणि अरण्य. ती निर्जनता भयाण होती. एकटेंच जाण्यामुळे मार्ग कंटाळवाणा वाटूं लागला. वाट चुकलों असें वाटून, दूर खोऱ्यांत धूर दिसला त्याच्या अनुरोधानें चारपांच झोपडयांच्या एका गोंडी गावांत पोचलों. समोर लहान वासरूं दिसलें, म्हणून दुधाची मागणी केली. तेव्हा कळलें की आदल्या रात्रीं वाघानें गाईला गारद केलें म्हणून ! माझें गाव अजून ७ मैलांवर होतें. गावांत पोचलों तेव्हा दवाखान्याच्या 'क्वार्टर'चे दारांत आई तांदूळ निवडीत बसली होती; तिला पाहून अत्यानंद झाला. चालण्याचा शीण गेला.

दवाखान्यांत भावाला काम नव्हतें. आठवडयांत पांच रोगी हें प्रमाण. बोलायला नाही ! वाचायला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही ! जेवायचें व निजावयाचें ! रात्रीं दारें उघडीं ठेवायची सोय नाही. सायंकाळ झाली की दारें लावून बसावयाचें. रोज रात्रीं वाघोबाची डरकाळी ऐकूं यावयाची ! भावाने कंटाळून बदलीकरिता अर्ज केला होता. सहा महिन्यांनंतर सुनावणीहि झाली होती; पण ज्या डाक्टराची बदली त्या गावीं झाली होती त्यानं आत्महत्या केली म्हणे !

दवाखान्यांत रोगी कां येत नाहीत, शोध करण्यासाठी मी घरोघर हिंडलों. इनमीन एकूण पन्नास झोपड्या. प्रत्येक घरांत हातापायाच्या काड्या व ढेवरपोट झालेलीं पोरें ! मोठीं माणसें मलेरियानं निःसत्व. कित्येकांस खरूज झालेली. प्रत्येक घरांत सरासरी दोन तरी रोगी होतेच. दवाखान्यांत जाण्याची भीति. रोग औषधानं बरे होत नाहीत, देवीचा प्रकोप झाला असेल, तिला कोंबडी बकऱ्याचा बळी देऊन 'वैग्या'ला दारू पाजून, त्याचेकडून 'झाडून घेतलें' म्हणजे रोग बरा होतो ही समजूत ! मी भावास सांगितलें, हीं भोळीं माणसं आहेत, घरोघर फिरूनच यांचें मन वळवावें व औषध द्यावें आणि त्यांना बरें करावें, हीच खरी सेवा ! येथे 'प्रॅक्टिस' म्हणजे पैसे मिळवायला वाव नाही; पण 'प्रॅक्टिस' म्हणजे अनुभवाला निरनिराळे प्रयोग करावयास पुष्कळच संधि आहे.

दुसरे दिवशीं सकाळीं मी गावची प्राथमिक शाळा बघण्यास गेलों. जमीनदाराच्या बापानं शाळा बांधून, ती 'डिस्ट्रिक्ट कौन्सिल'च्या स्वाधीन केली होती. त्यानंतर इमारतीकडे कोणीच लक्ष दिलें नव्हतें. त्या चंद्रमौळी घरांत पावसाळ्यांत गुराढोरांनी आश्रय घेतल्याने जमिनींत असंख्य खळगे पडले होते. अडीच फुटाच्या एका जीर्ण पट्टीवर तीन अर्धनग्न मुलें फुटक्या पाट्या घेऊन बसलीं होतीं. त्यांना एक शिक्षक शिकवीत होते, त्यांनी आमचें स्वागत केलें; आणि एकुलती एक खुर्ची भिंतीशीं जमवून ठेवली. एका निमिषार्धांत माझ्या लक्षांत आलें की खुर्चीचा एक पाय मोडलेला आहे.

शाळेची सरासरी उपस्थिति चार असते. सोळा मुलें पटावर आहेत. जमीदर स्वतः आपल्या मुलांस पाठवीत नाही. यथा राजा तथा प्रजा. त्याच्या आश्रितांनी शाळेंत मुलं पाठविणें बंद केलें. ही शाळेची हकीकत ऐकून, मी मास्तरांना घेऊन गोंड जमीदाराकडें गेलों. जमीदार ओसरींत एका जुनाट आराम खुर्चीवर लेटले होते व समोर 'दरबार' भरला होता. 'शहर कोतवाल' देखील हजर होता. आमचें स्वागत झालें. एक हात तुटलेली खुर्ची मला बसावयास मिळाली. मी जमीदारांना शिक्षणाचें महत्त्व सांगितलें. त्यांच्या वडिलांच्या औदार्याची प्रशंसा करून, त्यांच्या घराण्याचा अभिमान जागृत केला. त्यांनी घर दुरुस्त करण्याचें कबूल करून, तसा हुकूम कोतवालास माझ्या समोर सोडला. 'उद्यापासून जो कोणी मुलांस शाळेंत पाठविणार नाही त्यास दंड ठोठावण्यांत येईल.' प्रजाजन घाबरले. राजाचा आदेश त्यांनी शिरोधार्य केला. माझें काम झालें.

त्या दिवशीं सायंकाळची गोष्ट. मी एकटाच फिरावयास निघालों. नदीकडे एक पायवाट निघाली होती; तिनं जाऊं लागलों. झाडी दाट होऊं लागली. उंच उंच झाडें; पण तीं अत्यंत जवळ जवळ असल्यानं सूर्यास्त होण्यापूर्वीच काळोख पडला होता. माझें शहरी मन भित्रें होतें; कोठेहि पाचोळ्याचा आवाज झाला किंवा खुट्ट झालं की छातींत धडधडूं लागे. अंगाला घाम सुटे. पाय पुढे जाण्यास कां कूं करीत; पण बुद्धि मनाला धीर देई. पायांत बळ येऊन ते चालूं लागत.

सरते शेवटीं मी नदीवर आलों. नदीवरचें दृश्य पाहून मला स्वतःच्या भित्रेपणाची लाज वाटली. नदीच्या वाळवंटांत एक लहानशी मोडकी पर्णकुटी होती. तीन पोरें कुटीसमोर होतीं. सारीं नंगीं ! सर्वांत मोठें मूल सहा वर्षांचें व धाकटें दीडवर्षांचें असेल. धाकट्या मुलाच्या गुदद्वारास गळूं झालें होतें. त्यांतून पूं व रक्त वाहात होतें. माशा घोंघावत होत्या. मोठा मुलगा पानाने माशा वारीत होता. ती सडलेली जखम पाहून मला किळस आली, पण कींवहि आली. मुलांचा बाप रानांत काटक्या गोळा करीत होता. आई दूर कामावर गेली होती. थोड्याच वेळानं एक लंगोटी लावलेला काळा भिल्ल, मोळीच्या ओझ्याखाली वाकलेला, हातांतल्या उंच काठीच्या आधारानं रानांतली वाट काढीत येत असलेला दिसला. त्यानं मोळी खाली टाकून 'रामराम' केला. मी त्यास मुलाला तावडतोब दवाखान्यांत घेऊन जाण्यास सांगितलें. त्याला माझं म्हणणं मानवलं नाही. शेवटी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसऱ्या दिवशीं जाण्यास, तो मोठ्या कष्टानं कबूल झाला. रात्र होत होती म्हणून त्याचा मी निरोप घेतला. पण तो म्हणाला: 'महाराज थोडं थांबा. मी तुमचं कांहीच स्वागत केलं नाही.' त्यानं वाळवंटातल्या पाणथळ जागेंत स्वतःच्या मेहनतीनं लावलेल्या वेलांचीं दोन तीन कच्चीं कलिंगडं भराभर तोडलीं व माझ्या हातांत दिलीं. किती पैसे झाले म्हणून मी त्याच्या हातावर सहा आणे ठेवणार तोंच तो म्हणाला, 'महाराज, तुम्ही येथे येऊन माझ्यासारख्याची चौकशी केली. माझ्याजवळ तुम्हांला देण्यास या फळांवांचून काय आहे? माझी अल्प भेट म्हणून हीं फळं घ्या! मला पैसे नकोत! पैसे न घेण्याचा त्याचा निश्चय दृढ दिसला. त्याची ती माणुसकी पाहून माझं हृदय डोळ्यावाटे बाहेर पडूं लागलं. मी त्या देवमूर्तीच्या पायां पडलों व माझी आठवण म्हणून, दोन फळें त्या लहानग्यांना देऊन मी विचाराच्या गुंगींत घरीं आलों.

त्या रात्रीं अंथरुणांत मी तळमळत होतों. साता-समुद्राकडचे मिशनरी बांधव याच लोकासाठी येऊन घनघोर अरण्यांत वसती करतात आणि त्यांचे दुःख-कष्ट दूर करतात; आणि आम्ही उच्च शिक्षण घेऊन शहरांतील उंबरठे झिजवून, श्रमिकांचें रक्त प्राशन करून ढेकणाचें जीवन जगतों! धिक्कार असो अशा जीवनाला! मिशनऱ्यासारखी काम करण्याची संधि आपणांस कधीकाळीं मिळेल का! शहरचें विलासी जीवन सोडून, वनांतील तपश्चर्येचें प्राकृतिक जीवन जगण्याची संधि लवकर प्राप्त होवो अशी मनोभावें देवाची प्रार्थना करून, मध्यरात्र उलटून गेल्यावर माझा डोळा लागला.

असो, पत्र लांबत चाललं. सध्या तरी पुरे. कळावें.

आपला नम्र

ता. १-८-९३ नाना बापट, (मंडला)

: २ :

[युगवाणींत प्रसिद्ध केलेल्या 'आम्रमहिमा' या कवितेसंबंधी आलेल्या कांहीं पत्रांपैकी एक पत्र वाचकांना सादर करीत आहोंत. ह्यामुळे वाचकांची जिज्ञासा अधिक वाढेल अशी आशा आहे.

—संपादक युगवाणी]

संपादक युगवाणी यांस

स. न. वि. वि. आमचेकडे उतरलेल्या नागपूरच्या पाहुण्याजवळच्या 'युगवाणी' अंकांतील 'आम्रमहिमा' या कवितेकडे, तिच्यासंबंधी दिलेल्या आपल्या टीपेमुळे लक्ष गेलें व माझ्या मनांतहि कुतूहल उत्पन्न झालें. काव्य-विषयाच्या दृष्टीने व त्यामधील वर्णनाच्या ढंगामुळे त्यांत आधुनिकपणा वाटला, तरी तें काव्य जुनेंच असावें असें मला वाटतें.

सोबत 'रामदास रामदासी' ग्रंथमाला, भाग ७ वा, खंड ३ रा, यांतील 'आम्रवर्णना' संबंधी 'अवतरण' पाठवीत आहें त्यावरून अशा प्रकारचीं वर्णनें करण्याची पद्धति रामदासकाळीं तरी होती असें म्हणणें प्राप्त आहे. विशेष एवढाच की अशा कविता 'स्फुट' किंवा सुट्या नसत. आख्यायिका किंवा प्रसंग सांगण्याच्या ओघांत शा गोष्टी येत. अशाच एका प्रसंगीं रामदासांनी केलेलें वर्णन मला आढळलें तें आपण प्रसिद्ध करावें अशी विनंति आहे. प्रसिद्ध करतांना आपण आधुनिक कविता देतांना जो 'टाईप' वापरतां तो वापरावा येवढीच विनंति आहे.

'आम्रमहिमा' हें 'स्फुट' प्रकरण आहे अथवा एखाद्या प्रसंगानें कोणी कवीनें वर्णन केलें आहे, याचें स्पष्टीकरण आपण शेवटच्या टीपेंत कराल अशी आशा आहे कवितेचा आरंभ व शेवट यांत आपण संदिग्धता राखल्याने मनांत सुचलेल्या तर्काला रेखीवपणा येत नाही, येवढें आपल्या निदर्शनास आणावेंसें वाटतें. तथापि कविता रामदासपूर्वकालीन असावी, अशी माझी कल्पना आहे.

आपला

एक धुळेकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आम्रवर्णन

ऐका ऐका थांबा थांबा । कोण फळ म्हणविलें गा । सकळा फळांमध्ये आंबा । मोठें फळ ॥१॥ त्याचा स्वाद अनुमानेना । रंगरूप हें कळेना । भूमंडळीं आंबे नाना । नाना ठाईं ॥२॥ मावे हिरवे सिंधुरवर्ण । गुलाली काळे गौर वर्ण । जांभळे ढौळे रे नाना जाण । पिवळे आंबे ॥३॥ आंबे येकरंगीं दुरंगीं । पाहों जातां नानारंगीं । अंतरंगी बाहेरंगी । वेगळाले ॥४॥ आंबे वाटोळे लांबोळे । चापट कळकुंबे सरळे । भरीव नवनीताचे गोळे । ऐसे मऊ ॥५॥ नाना फळांची गोडी ते । आंब्यामध्ये आडळते । सेपे कोथिंबिरी वासाचे । नानापरी ॥६॥ आंबे वाकडे तिकडे । खवंड नाकाडे लंगडे । केळकुहिरे तुरजे इडे । बाह्याकार ॥७॥ कोणी लहान दाणे मोठे । मगज अमृताचे साटे । हातीं घेतां सुख वाटे । वास येतां ॥८॥ सोफसालीहि असेना । नासक वीटक दीसेना । टाकावे वस्त्रावरी नाना । कोरडें आंबे ॥९॥ येक आंबा वाटी भरे । नुस्ते रसामध्यें गरे । खातां श्रमचि उतरे । संसारीचा ॥१०॥ आंबा तगणाऊ नासेना । रंग विरंग दिसेना । सुकतां गोडीहि सांडिना । कांहीं केल्या ॥११॥ भूमंडळीं आंबे पूर्ण । खाऊन पाहतो तो कोण । भोक्ता जगदीश आपण । सकला ठायीं ॥१२॥ नाना वर्ण नाना स्वाद । नाना स्वादामध्ये भेद । नाना सुवासें आनंद । होत आहे ॥१३॥ आंबे लावावे लाटावें । आंबे वाटावे लुटावे । आंबे वाटितां सुटावें । कोणीतरी ॥१४॥ नाहीं जळ तेथ जळ कां ते उदंड आंब्रफळ । परोपकाराचे केवळ । मोठें पुण्य ॥१५॥ पुण्य करावें करवावें । ज्ञान वरावें धरवावें । स्वयें तरावें तरवावें । येकमेका ॥१६॥ मी तों बोलिलों स्वभावें । यांत मानेल तितुकें घ्यावें । कांही सार्थक करावें । संसाराचें ॥१७॥ दास म्हणे परोपरी । शब्दापरीस करणी बरी । जिणें थोडें ये संसारीं । दो दिसांचें ॥१८॥

रामदास (रामदास रामदासी ग्रंथमाला, भाग ७ वा, खंड ३ रा, पान ५१९)

ग्रंथ समालोचन

'प्रकाशाकडे'–(कवितासंग्रह)–कवि व प्रकाशक: ल. वा. पडोळे, संचालक, 'पूजा' प्रकाशन, नागपूर १. पृष्ठें ६४. मूल्य १ रु.

'रानगुलाब'––(कवितासंग्रह)––कवि सी. म. बापट, प्रकाशक–दि. मा. धुमाळ, नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. पृष्ठें १४०, मूल्य २॥ रु.

'आमचीं गाणीं' (काव्य–संकलन) संग्राहिका –श्रीमती कुसाबाई दत्तोपंत दामले, यवतमाळ. संपादिका व प्रकाशिका सौ. उषाबाई दामले, बी. ए. आनंद–प्रकाशन, टिळकवाडी, यवतमाळ. पृष्ठें ६७, मूल्य १ रु.

'प्रकाशाकडे' हा नागपूरचे उदयोन्मुख कवि व पूजा–प्रकाशनाचे धाडसी संचालक श्री. ल. वा. पडोळे यांच्या कवितांचा संग्रह. त्यांच्या मतें ह्या संग्रहांत इ. स. ४५ पासून ५२ च्या मध्यापर्यंत कवीच्या मनोविकासाचा प्रत्यय रसिकांना यावा ! आपल्या अपत्याचें कौतुक जगानें करावें अशी इच्छा वत्सल पित्यानें बाळगणें साहजिकच आहे. पण पित्याला कांहीहि जरी वाटलें तरी त्याच्या बालकाच्या गोंडसपणावरच इतरेजनांना त्याच्याविषयीं वाटणारें कौतुक अवलंबून आहे. अलंकारांत न शिरतां स्पष्टच शब्दांत सांगावयाचें तर कवि पडोळे यांचा हा कवितांचा संग्रह रसिकप्रिय होईल असें वाटत नाही. आणि हा संशय

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतः प्रस्तावनाकार श्री. शं. बा. शास्त्री ह्यांनाहि आलेला दिसतो. म्हणूनच 'श्री. पडोळे यांच्या ह्या कवितासंग्रहाचें वाचक स्वागत करोत' असें वाक्य शेवटी उद्गारचिन्ह देऊन ते लिहून जातात.

काव्यलेखनाला आवश्यक असलेली वेचक शब्दयोजना व शब्दांवरील प्रभुत्व ह्या कवितासंग्रहांत अभावानेच आढळेल! मुक्तछंदाचा काव्यवाहन म्हणून उपयोग करतांना आंदोलनात्मक गति कायम ठेवणें अवश्य असतें ही जाणीव असूनहि कवीने तिकडे द्यायला हवें तेवढें लक्ष दिलेलें दिसत नाही. आणि म्हणूनच बहुतेक सर्व कवितांची घडण खडबडीत व गद्यप्राय वाटते. मात्र आजच्या युगांतील मानवी-जीवन कसें कृत्रिम, नीरस आणि भ्रष्ट आहे, ह्याची कल्पना संग्रहांतील कांही कविता वाचून वाचकाला येऊं शकेल! कवीला काव्यक्षेत्रांत नांव मिळवावयाचें असेल तर मात्र त्याने साक्षेपाने कवितेच्या रचनेकडे व शब्दयोजनेकडे अधिक लक्ष पुरवून आपल्या अनुभूतींची क्षितिजें विशाल करावयाला हवींत ही मित्रत्वाची सूचना या ठिकाणीं देणें अनाठायीं होणार नाही!

'रानगुलाब' या संग्रहांत, 'फुलांचे अश्रू' या काव्यसंग्रहाचे लेखक श्री. सी. म. वापट ह्यांच्या कांही निवडक कवितांचा समावेश केला आहे. 'रानगुलाब' ह्या संग्रहाच्या नांवावरून कवि हा निसर्गप्रेमी असावा अशी प्रथमदर्शनीं कल्पना होते. आणि कवितांच्या आस्वादानंतर ही कल्पना खरी असल्याची आनंददायक जाणीव वाचकांना होते! संग्रहाची सुरवात 'रानगुलाब' या कवितेने करून शेवटीं 'फुलांचें मागणें' ही कविता देण्यांतहि कवीला आपल्या निसर्गाविरील प्रेमाची सूचनाच द्यावयाची आहे, असें म्हटलें तरी चालेल! आणि कवीची भूमिका ध्यानांत घेतां असें साहजिकच आहे. नित्य नव्या रम्यतेने आणि दिव्यतेने नटणारी सृष्टिसुंदरी ही कवितेची आई--खरी आई आहे असा कवीचा अभिप्राय असल्याने सृष्टिसौंदर्यामुळे कविप्रतिभा जागृत झाल्यास आश्चर्य वाटूं नये. कवीला ते सृष्टीचा बाळ म्हणतात.

'सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कवि धाकुटा' असा अभिप्राय 'बी' कविहि देतातच! ह्या दृष्टीने कवीच्या 'रानगुलाब' 'सृष्टीचें बाळ' 'साक्षात्कार' 'कधी येशील तूं!' 'हिरवी शाळा', 'नदीकिनारीं' इत्यादि कविता मुळांतूनच वाचाव्यात. वेचक शब्दयोजना आणि नादमधुर रचना यांच्याच जोडीला सूचक वर्णनांची पेरणी ह्या वैशिष्ट्यामुळे सदर संग्रहांतील कविता जनमनाला आनंदित करूं शकतील असा विश्वास वाटतो. मात्र निसर्गाविषयीं वाटणाऱ्या या तीव्र ओढीमुळे भोवतालच्या जगाकडे कवीने पाठ फिरविली असें म्हणतां येणार नाही. निसर्गदेवतेच्या आराधनेबरोबरच त्यांनी दरिद्र नारायणाकडेहि लक्ष पुरविलें आहे. याचा पुरावा 'भिक्षा' हें सुनीत देऊं शकेल. जीवनाकडे पाठ फिरविणाऱ्या माणसाला जगांत कोठेच स्थान मिळणार नाही असा विश्वास बाळगणारा कवि जीवनाला पराङ्मुख होईल हें कसें संभवेल? फुलांचें मनोगत जाणणारा हा कवि तेवढ्याच तत्परतेने भिकारी, डुकराचें पोर, शाळा मास्तर, म्हातारा बैल आदि विविध विषयांशीं समरस होऊं शकतो. कवि आशावादी आहे. सौंदर्यप्रिय आहे. आणि त्याच्या या वृत्तीचें चित्रण या संग्रहांतील सर्वच कवितांतून ठळकपणें झालेलें आहे, हें कवीला भूषणास्पद आहे.

संग्रहांत दोष मात्र एकहि नाही असें नाही. आशय आणि अभिव्यक्तीचा तोच-तो-पणा, क्वचित गद्यप्राय रचना हे दोष कवि श्री. निकुंबांनी संग्रहाच्या प्रस्तावनेंत दाखविले आहेतच. मात्र श्री. वापटांच्या कवितांवर कोणत्याच कवीची छाया पडली नाही असें त्यांचें विधान पूर्णसत्य वाटत नाही. कवींची शैली स्वतंत्र असली तरी बऱ्याच ठिकाणीं बी कवींच्या काव्याची छाप शैलीवर पडलेली आढळते; पण ती दीर्घ कवितांच्या रचनेवरच!

एकंदरींत प्रस्तुत संग्रह विषय, रचना, कल्पनाप्राचुर्य आदि सगळ्याच दृष्टीने काव्यरसिकांस प्रिय होईल, असा विश्वास वाटतो. मराठी काव्याच्या पुस्तकांत सुंदर भर घातल्याबद्दल कवीचें मनःपूर्वक अभिनंदन.

'आमचीं गाणीं' 'शारदाश्रम' या संस्थेद्वारा पुरस्कृत व महाराष्ट्रांतील अग्रगण्य साहित्यिका सौ. कुसुमावती देशपांडे यांची प्रस्तावना लाभलेला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक गीतसंग्रह आहे. मात्र हीं गीतें कोणत्याहि एका कवयित्रीने लिहिलेलीं नाहीत. प्राचीन संस्कृतींत वाढलेल्या, सश्रद्ध अशा स्त्रियांच्या तोंडीं रुळत असलेलीं हीं भक्तिगीतें आहेत. खऱ्या अर्थानें हीं अक्षरकाव्यें आहेत. वास्तविक अशीं असंख्य गाणीं जुन्या संस्कृतीवर वाढलेल्या आमच्या निरक्षर बायाबापड्यांच्या तोंडीं नेहमीच रुळत असतात. स्त्रीजीवनाचे विविध पैलू त्या गीतांतून चमकत असतात. परंतु आमच्या अनास्थेमुळे आम्ही आजवर ह्या अपौरुषेय वाङ्मयांतील थोडासाहि भाग अक्षरनिविष्ट करूं शकलों नाही. प्रस्तुत संग्रहाचें प्रकाशन हा असाच एक अभिनंदनीय प्रयत्न आहे. आणि तोहि प्रयत्न आपल्या वयाचीं ८० वर्षें उलटून गेलीं असतांहि श्रीमती कुसाबाई दामले ह्यांनी आपल्या स्मृतीवर भिस्त ठेवून करावा ही अत्यंत कौतुकाची गोष्ट होय! त्यांच्या स्मृतिकपाटांतील ही ठेव रसिकांपुढे मांडण्यांत सौ. उषाबाई दामल्यांनी कौटुंबिक कर्तव्याबरोबरच आपल्या मातृभाषेविषयींचें कर्तव्यहि पार पाडलें आहे.

वसंत वऱ्हाडपांडे

संघशाखा, सभासद व प्रचारक यांना विनंती

जास्तींत जास्त सभासद बनवा

वि. सा. संघाच्या घटना नियम १२ (आ) प्रमाणे मतदार सभासदांच्या सूचींत नांवें समाविष्ट करण्याची **अखेरची तारीख १५ आक्टोबर** ही आहे. या तारखेपर्यंत ज्या सभासदांचीं नांवें वार्षिक वर्गणीसह केन्द्रीय कार्यालयाच्या नोंदणीवहींत नोंदलीं जाणार नाहीत, त्यांचा मतदार सभासदांच्या सूचींत समावेश होणार नाही. म्हणून ज्या सभासदांनी आपली वार्षिक वर्गणी अजून भरली नाही त्यांनी ती त्वरित पाठविण्याची कृपा करावी. तसेंच प्रचारकांनी जास्तीत जास्त सभासद बनवून सभासदांची वार्षिक वर्गणी कार्यालयीन पावत्यांसह १५ आक्टोबर १९५३ पर्यंत केन्द्रीय कार्यालयांत जमा करावी.

बाहेर गावच्या प्रचारकांनी व संघशाखांनी कृपा करून उपरिनिर्दिष्ट तारीख ध्यानीं घ्यावी व कार्यालयीन पावत्यांसह सभासदांची वार्षिक वर्गणी या तारखेपर्यंत केन्द्रीय कार्यालयांत पोचेल अशी काळजी घ्यावी. या कामीं कोणतेहि घोटाळे होऊं नयेत म्हणून अगाऊ दीड महिन्याची सूचना देण्यांत येत आहे.

तद्वत्च जास्तींत जास्त सभासद बनवून विदर्भ साहित्य संघ अधिक बळकट करावा, अशी सर्वांना विनंती आहे.

दि. २६-८-१९५३
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर १

आपला नम्र
ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

वि. सा. संघाच्या समित्या व उपसमित्या
[१९६३-६४ सालासाठी]

मंदिर रचना समिति : अध्यक्ष—न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति; आमंत्रक—श्री. ग. शि. उर्फ नानासाहेब जोग, सभासद—श्री. भाईसाहेब करजगांवकर, श्री. प. मो. येरगांवकर, ॲड० श्री. गो. घुले, श्री. गो. आ. उर्फ बाबासाहेब भोंघुले, डॉ. य. खु. उर्फ आप्पासाहेब देशपांडे, श्री. आ. रा. देशपांडे, श्री. म. श्री. मंगरूळकर, श्री. दीनदयालजी गुप्ता, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. रा. पु. सगदेव, श्री. आर. एन्. गोरे व श्री गोपाळ सीताराम करंदीकर.

मंदिर निधि समिति : अध्यक्ष—न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति; संयोजन मंत्री—श्री. बाबुराव चिमोटे; संयुक्त कार्यवाह—श्री. ना. गो. ओगले, श्री. रा. पु. सगदेव व श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; सभासद—श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे आणि अधिकारपरत्वें—प्रा. भ. श्री. पंडित (संघाध्यक्ष), प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे (कोषाध्यक्ष) व श्री. ना. रा. शेंडे (सरचिटणीस).

राजभाषा अधिनियम उपसमिति : आमंत्रक—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; सभासद—श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ए. श्री. पटवर्धन व प्रा. श्री. ना. बनहट्टी.

परीक्षा समिति : संचालक—प्रा. पां. कृ. सावळापूरकर; सदस्य—डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, सौ. उषाताई कोलते, श्री. द. शं. फडके व श्री. ना. ग. डबीर. कार्यवाह—माणिक के. वैतुले.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति : आमंत्रक—श्री. रा. पु. सगदेव; सभासद—प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. श्री. वि. गंधे, श्री. र. वि. कुळकर्णी व श्री. पां. बा. गडकरी.

निविदा समिति : अध्यक्ष—प्रा. भ. श्री. पंडित (संघाध्यक्ष) संघाध्यक्षाच्या अनुपस्थितींत उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे अध्यक्ष; आमंत्रक—डॉ. मा. गो. देशमुख; सभासद—प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. वा. कृ. चोरघडे व श्री. ह. ना. नेने.

प्रकाशन समिति : आमंत्रक—श्री. ह. ना. नेने; सभासद—श्री. पां. बा. गडकरी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. दा. ल. अडोणी, प्रा. वा. कृ. चोरघडे व श्रीमती सरलाबाई प्रधान.

साहित्यसंस्था सहकार्य समिति : आमंत्रक—प्रा. श्री. मा. कुळकर्णी; सभासद—प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. वि. ना. करबेलकर, श्री. दि. ब. पंडित व श्री. पु. त्र्यं. दारव्हेकर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यक्रम समिति आमंत्रक--श्री. ग. शि. उर्फ नानासाहेब जोग; सभासद—श्री. मनोहरपंत जुनघरे, श्री. केशवराव केळकर, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. ह. ना. नेने, प्रा. श्री. वि. गंधे व श्री. त्रिं. गो. देशमुख.

घटनाविषयक प्रश्न समिति : अध्यक्ष—न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति; आमंत्रक—द. रा. गोमकाळे व सभासद—श्री. पु. य. देशपांडे.

परिभाषा समिति : आमंत्रक—डॉ. मा. गो. देशमुख; सभासद—प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. वि. ना. करंबेळकर, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. श्री. स. पेंढारकर व प्रा. दा. ल. अडोणी.

शुद्धलेखन समिति : आमंत्रक—डॉ. मा. गो. देशमुख; सभासद-डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. ह. ना. नेने व श्री. द. ह. अग्निहोत्री.

सीमा समिति : आमंत्रक—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; सभासद-डॉ. पंजाबराव देशमुख, श्री. पु. य. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते; श्री. ए. श्री. पटवर्धन, प्रा. श्री. ना बनहट्टी, श्री. ह. ना. नेने व श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे.

संघशाखा उपनियम समिति : अध्यक्ष-श्री. पु. य. देशपांडे; आमंत्रक-श्री. म. बा. देवघरे (चिटणीस, अमरावती संघशाखा) व सभासद-श्री. वसंतराव शब्दे (चिटणीस, भंडारा संघ शाखा) आणि श्री. ना. ग. डबीर (चिटणीस, गोंदिया संघशाखा)

युगवाणीचें संपादक मंडळ संपादक-श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे. संपादक मंडळावरील सदस्य-श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. गो. रा. दोडके, श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, प्रा. अ. ना. देशपांडे, श्री. म. बा. देवघरे, श्री. त्रिं गो. देशमुख, सौ. उषाताई कोलते आणि सौ. इंदुमती शेवडे.

गडकरी स्मारक समिति

अध्यक्ष-न्यायमूर्ति वा. रा. उर्फ काकासाहेब पुराणिक; कार्याध्यक्ष-कु. ताराबाई प्रधान; चिटणीस-श्री. पां. बा. गडकरी; सदस्य-श्री. नानासाहेब ओगले, श्री. चंदुलाल सुळे, सौ. पद्मावतीबाई चिटणवीस, श्री. टी. आर. उर्फ नानासाहेब नागले, सौ. उषाताई कोलते, श्री. रा. पु. सगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी, प्रा. श्री. वि. गंधे व श्री. नी. सी. कारखानीस.

* *

डॉ. ना. वा. मोडक यांची देणगी

डॉ. नारायण वामन मोडक यांनी विदर्भ साहित्य संघाला एक कांग्रा कलम व एक मोगल कलम अशीं दोन मूळ रंगचित्रें भेट म्हणून दिलीं. त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा फार आभारी आहे.

* *

कवि राजा बढे यांची भेट व काव्यगायन

महाराष्ट्राचे लोकप्रिय कवि श्री. राजा बढे यांनी शनिवार दि. २२-८-१९५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं डॉ. मा. गो. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली त्यांचें सुश्राव्य काव्यगायनहि झालें.

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोंदिया शाखा वृत्त

मित्रमंडळाची विदर्भ साहित्यमंदिराला देणगी

गोंदियाच्या महाराष्ट्रीय समाजाने चालविलेल्या मित्रमंडळाने गतवर्षीच्या गणेशोत्सवांतून शिल्लक राहिलेली ५१ रुपयाची रक्कम विदर्भ साहित्य मंदिराच्या टिळक दालनाला देणगी म्हणून वि. सा. संघाच्या कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्याकडे पाठविली आहे.

मराठीची आबाळ

वि. सा. संघाचे पदाधिकारी म्यु. क. च्या शिक्षणाधिकाऱ्यांना भेटले व मराठी शिक्षणाची कशी आबाळ होत आहे हें त्यांनी समजावून दिलें. त्यांनी सहानुभूतीने सर्व ऐकून घेऊन चौकशीला प्रारंभ केला आहे आणि मराठीच्या शिक्षणाची आबाळ होणार नाही असें आश्वासन दिलें आहे. वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेतर्फे अध्यक्ष श्रीमान् छोटुभाई, श्री. केशवराव इंगळे, श्री. नानासाहेब तैलंग, श्री. वि. अ. लिमये व श्री. ना. ग. डबीर ही मंडळी गेली होती.

शाखेकरिता जागा

विदर्भ साहित्य संघ व महिला समाज यांच्या संयुक्त कार्यकारिणींची बैठक ता. ९-८-५३ रोजीं वि. सा. संघाचे अध्यक्ष श्रीमान् छोटुभाई क्षत्रीय यांचेकडे भरली. जागेबाबत दोन्ही कार्यकारिणींत बराच विचारविनिमय झाला आहे. म्युनिसिपल कमटीकडे जागेकरिता अर्ज करावा असें ठरून संयुक्त सभा आटोपली. महिला समाजाच्या भगिनींनी वि. सा. संघाच्या कार्याला सक्रिय मदत करण्याचेंहि कबूल केलें आहे.

परीक्षा केन्द्र

आगस्टच्या येत्या परीक्षेला एकून ३४ विद्यार्थी निरनिराळ्या परीक्षांना बसणार आहेत व त्याकरिता वर्गहि घेतले जात आहेत. श्री. आनंद देशपांडे, श्री. वसंत भालेराव व श्री. घुसे यांनी परीक्षाकार्याला बहुमोल मदत केली आहे.

ना. ग. डबीर
चिटणीस वि. सा. संघ, गोंदिया शाखा

'युगवाणी'च्या लेखकांस सूचना—

(१) लेख सुवाच्य अक्षरांत कागदाच्या एका बाजूने माया सोडून लिहावा.
(२) **कोणताहि लेख 'युगवाणी'च्या सुमारें चार पानांहून अधिक नसावा.**
(३) पुरेसें टपालहशील असल्याशिवाय अस्वीकृत लिखाण परत केलें जाणार नाहीं.
(४) लेखकांनी नवीन शुद्धलेखनाचे नियम पाळावेत.
(५) स्वीकृत लिखाण यथावकाश प्रसिद्ध होईल. ह्यासाठी लेखकांनी वृथा पत्रव्यवहाराचा त्रास घेऊं नये.
(६) लेखकांनी आपला पत्ता सुवाच्य अक्षरांत लिहून आपल्या लेखासह पाठवावा. पत्ता नीट नसल्यामुळे लेखकांकडे अंक पाठविणें कठीण जातें.

संपादक 'युगवाणी'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिति, विदर्भ साहित्य संघ, नागपूर
केंद्रानुसार परीक्षार्थी विवरण

केंद्र क्रमांक	केंद्राधिकारी	केंद्र	परीक्षार्थी संख्या ऑगस्ट १९५३
१	श्री. द. शं. फडके, बी. ए., बी. टी.	अमरावती	२८
२	श्री. रा. रा. त्रि. वा. जोग, बी. ए., बी. टी.	अकोला	४
३	श्री. मा. चं. बहादूरकर, बी. ए., बी. टी.	आकोट	१९
५	श्री. ह. ध. सगणे, बी. एस्सी., बी. टी.	आर्वी	३
६	श्री. मो. वि. फुरसुले, बी. ए., बी. टी.	कारंजा	१४
७	श्री. ॲडव्होकेट, वि. अ. लिमये, बी. एस्सी.	गोंदिया	३४
८	श्री. साहित्यभूषण तु. ना. काटकर	चांदा	२३
११	श्री. कृ. आ. पाठक, बी. ए., बी. टी.	दारव्हा	३४
१२	श्री. प्रा. पां. कृ. सावळापूरकर	भा. मा. मंदिर, नागपूर-२	५३
१३	श्री. पं. हृषीकेश शर्मा	म. प्र. रा. प्र. स. नागपूर-१	१३
१५	श्री. म. के. राजूरकर, बी. ए., बी. टी.	नांदुरा	२३
१७	श्री. शं. य. मेलग, बी. ए.	यवतमाळ	४१
१९	श्री. तांबस्कर	वरूड	१०
२०	श्री. व. पं. तांदळे	वर्धा	७
२१	श्री. गो. आ. भांडारी, बी. ए., एल्एल्. बी.	साकोली	१०
२१	श्री. रा. वि. करपे, बी. ए., बी. टी.	हिंगणघाट	३१
२५	श्री. श्री. पुं. कठाळे, राष्ट्रभाषा कोविद	धामणगांव	३२
२७	श्री. ल. दा. पाठक बी. ए., विशारद	वरोडा	३२
३०	श्री. ना. ग. उबगडे, एम्. ए., बी. टी.	भंडारा	२२
३३	श्रीमती रत्नप्रभाबाई घारपुरे	खामगांव	२०
३४	श्री. शं. रा. बखारे, बी. ए., एल्एल्. बी., बी. टी.	पांढुर्णा	१४
३५	श्री. श्री. सु. तोडरे	ज. इं. मि. स्कूल, नागभीड	१५
३९	श्री. आ. ल. गुरनुले	स. सि. वे. शाळा, नागभीड	१५
४४	श्री. पां स. नानोटी, बी. ए., बी. टी.	उमरेड	२०
४५	श्री. जमुनादास व्यास, एम्. ए., साहित्यरत्न	सिंदी	१२
४६	श्री. वा. स. पानट	मलकापूर	१५

एकूण परीक्षार्थी ५९०

माणिक के. वैतुले
कार्यवाह, परीक्षा समिति, वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(Nagpur) Regd. No. N 96.

महाराष्ट्र शाळाखात्याने ग्रंथालयांसाठी मंजुरी मिळालेले
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची पूर्तता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमानें सुरु करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेनें तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तीत जास्त संख्येनें वि. सा. संघाचे सभासद मिळवून द्या.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ